रायगड, नवी मुंबई

◆ वर्ष १९ ◆ अंक ४८
www.ramprahar.com

# राम प्रहर

◆ गुरुवार, ३ सप्टेंबर २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

पनवेलमध्ये सारीपाट स्पर्धेची रंगत; तरुणांचा सहभाग/२
हुक्का बारवर कारवाई; चौघांवर गुन्हा दाखल/६
अलिबागमध्ये रायसोनी स्मृती चषक बुद्धिबळ स्पर्धा/८

## पहिलीवहिली महिला चॅम्पियन्स ट्रॉफी भारतात खेळवली जाणार



**नवी दिल्ली :** आयसीसीने पहिल्यावहिल्या महिला चॅम्पियन्स ट्रॉफीचे यजमानपद भारताला दिले आहे. याचबरोबर स्पर्धेचे वेळापत्रक आणि यजमान स्थळांचीही घोषणा करण्यात आली आहे. सहा संघांचा समावेश असलेली ही प्रतिष्ठित स्पर्धा पुढील वर्षी १४ ते २८ फेब्रुवारी मुंबई आणि वडोदरामध्ये खेळवली जाणार आहे. या स्पर्धेत भारतासह जगभरातील सहा अव्वल संघ विजेतेपदासाठी झुंज देतील. ही स्पर्धा खरेतर श्रीलंकेत आयोजित करण्याचे नियोजित होते, मात्र आयसीसीच्या वार्षिक बैठकीत ठरलेल्या सुधारणांच्या अंमलबजावणीची प्रक्रिया सुरू असल्याने ही स्पर्धा भारतात खेळवण्यात येणार असल्याचे जाहीर केले. आयसीसीने बांगलादेश, भारत आणि दक्षिण आफ्रिका यांचा संभाव्य यजमान म्हणून विचार केला होता. अखेर या स्पर्धेच्या यजमानपदासाठी भारताची निवड करण्यात आली आहे.

# शासकीय योजना-धोरणांचे होणार मूल्यमापन

### मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली 'महा-टॅक'ची स्थापना

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्य शासनाकडून राबविण्यात येणाऱ्या विविध महत्त्वपूर्ण योजना आणि धोरणांचा प्रत्यक्ष परिणाम तपासण्यासाठी तसेच सार्वजनिक निधीच्या खर्चातून अपेक्षित परिणाम साध्य होत आहेत का याचे मूल्यमापन करण्यासाठी 'महाराष्ट्र टेक्निकल असिस्टन्स सेल' (महा-टॅक) स्थापन करण्यात येणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली महा-टॅकचे कामकाज चालणार आहे.

इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट मुंबई आणि सेंटर फॉर रिसर्च इन स्कीम्स अँड पॉलिसीज (सीआरआयएसपी) यांच्या सहकार्याने महा-टॅक कक्ष कार्यरत केला जाणार असून त्यातून शासनाला वस्तुनिष्ठ माहिती व डेटा-आधारित निर्णय घेण्यास मदत होणार आहे. या माध्यमातून लोककल्याणकारी योजनांचे मूल्यमापन आणि प्रभावी अंमलबजावणीला गती मिळेल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.



वर्षा निवासस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली महा-टॅकच्या स्थापनेसंदर्भात आयआयएम मुंबईच्या वतीने सादरीकरण करण्यात आले. यावेळी मुख्य सचिव राजेश अग्रवाल, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव लोकेश चंद्र, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी, गृह विभागाच्या अपर मुख्य सचिव मनीषा म्हैसकर, उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे अपर मुख्य सचिव वेणूगोपाल रेड्डी, आयआयएमचे संचालक मनोज कुमार तिवारी, विविध विभागांचे अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव आणि वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, राज्य शासन विविध लोककल्याणकारी योजना राबवत आहे. या योजना अधिक प्रभावी, पारदर्शक आणि वेळेत जनतेपर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. योजनांच्या अंमलबजावणीबाबत अचूक आणि वस्तुनिष्ठ माहिती वेळेत उपलब्ध झाल्यास त्यातील त्रुटी ओळखून तातडीने सुधारात्मक उपाययोजना करणे शक्य होईल. त्यामुळे प्रत्येक योजनेची सविस्तर माहिती, अंमलबजावणी आणि लाभार्थ्यांवरील परिणाम याबाबतचा डेटा महा-टॅककडे उपलब्ध असणे आवश्यक आहे. या माध्यमातून उपलब्ध होणारा वस्तुनिष्ठ डेटा शासनाच्या निर्णयप्रक्रियेला अधिक सक्षम आणि प्रशासनाला अधिक कार्यक्षम बनवेल. विभागप्रमुखांनी या उपक्रमाकडे सकारात्मक दृष्टिकोनातून पाहून प्रभावी अंमलबजावणीसाठी सहकार्य करावे.

**दर तीन महिन्यांनी स्वतंत्र फिल्ड सर्वेक्षण**

महा-टॅकमध्ये राज्यातील २५ प्रमुख कल्याणकारी योजनांचे दर तीन महिन्यांनी स्वतंत्र फिल्ड सर्वेक्षण करण्यात येणार आहे. दर तिमाहीला राज्यातील १२ जिल्ह्यांमधील ११ हजार ६०० लाभार्थ्यांच्या प्रत्यक्ष मुलाखती घेण्यात येतील तसेच सुमारे एक हजार ५०० वंचित घटकांची तपासणी केली जाणार आहे. वर्षभरात एकूण ४६ हजार ४०० लाभार्थ्यांच्या मुलाखती घेऊन योजनांचे नियमपालन, खर्चाची परिणामकारकता, लाभार्थ्यांपर्यंत पोहच आणि विविध विभागांमधील समन्वय यांचे मूल्यमापन केले जाईल. या मूल्यमापनातून प्राप्त होणाऱ्या अहवालाच्या आधारे प्रशासनाला तातडीने सुधारणा करणे शक्य होईल. **(पान २ वर..)**

## दिशा सालियन मृत्यू प्रकरणाचा तपास सीबीआयकडे

**मुंबई : प्रतिनिधी**



अभिनेता सुशांत सिंह राजपूतची माजी व्यवस्थापक म्हणून ओळखली जाणारी दिशा सालियन हिच्या मृत्यू प्रकरणात मुंबई उच्च न्यायालयाने महत्त्वाचा आदेश दिला आहे. दिशाच्या मृत्यूचा तपास केंद्रीय अन्वेषण विभाग अर्थात सीबीआयकडे सोपवण्याचे निर्देश न्यायालयाने दिले आहेत.

दिशाचा मृत्यू मालाड परिसरातील एका उंच इमारतीच्या १४व्या मजल्यावरून पडल्याने झाला होता. या प्रकरणात विविध दावे आणि आरोप करण्यात आले होते. त्यामुळे प्रकरणाचा तपास केंद्रीय यंत्रणेकडून व्हावा, अशी मागणी करण्यात आली होती.


हायकोर्टाने दिशा सालियन मृत्यू प्रकरणाचा तपास सीबीआयकडे देण्याचे निर्देश दिले आहेत. त्यामुळे या प्रकरणातील घटनाक्रम, उपलब्ध पुरावे आणि मृत्यूच्या परिस्थितीचा तपास आता केंद्रीय तपास यंत्रणेकडून केला जाणार आहे. याबद्दल दिशाचे वडील सतीश सालियन यांनी कोर्टाचे आभार मानले आहेत.

या आदेशासोबतच हायकोर्टाने एक महत्त्वाची बाब स्पष्ट केली आहे. तपास अधिकाऱ्याला एखाद्या व्यक्तीविरोधात पुरेसे प्राथमिक साहित्य किंवा ठोस आधार मिळेपर्यंत त्या व्यक्तीला आरोपी म्हणून पाहिले जाऊ नये, असे न्यायालयाने स्पष्ट केले आहे. त्यामुळे तपासादरम्यान समोर येणारे पुरावे आणि तपास अधिकाऱ्याचे निष्कर्ष यांना महत्त्व असेल.



**मुंबई : मौजे भाताण (ता. पनवेल) येथील 'आकारीपड' जमिनीवरील शेतकऱ्यांच्या राहत्या घरांबाबत निर्माण झालेल्या प्रश्नावर आमदार महेश बालदी आणि आमदार प्रशांत ठाकूर यांनी महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्यासमवेत झालेल्या बैठकीस उपस्थित राहून सविस्तर चर्चा केली. शेतकरी, कष्टकरी आणि स्थानिक नागरिकांच्या हक्कांचे संरक्षण व्हावे तसेच त्यांच्या राहत्या घरांवर अन्याय होऊ नये यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्याच्या सूचना यावेळी मंत्रीमहोदयांकडून अधिकाऱ्यांना देण्यात आल्या.**

## विशाखा राऊत यांना कोर्टाकडून दिलासा नाही!



**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई महानगरपालिकेच्या नगरसेविका विशाखा राऊत यांना मुंबई उच्च न्यायालयाने मोठा धक्का दिला आहे. ठाकरे गटाच्या राऊत यांची नगरसेवकपद रद्द करण्याविरोधात दाखल केलेली याचिका उच्च न्यायालयाने बुधवारी (दि.२) फेटाळून लावली.

पालघरच्या जात पडताळणी समितीने विशाखा राऊत यांचे ओबीसी जात प्रमाणपत्र अवैध ठरवले होते. त्यामुळे त्यांचे नगरसेवकपद धोक्यात आले होते. यानंतर मुंबई महापालिकेने राज्य सरकारला पत्र लिहित राऊत यांचे नगरसेवकपद रद्द झाल्याचे जाहीर करायला सांगितले होते. पालिकेच्या या पत्रव्यवहाराला राऊत यांनी उच्च न्यायालयात आव्हान दिले होते, मात्र त्यांना दिलासा मिळाला नाही. आता राऊत यांचे नगरसेवकपद रद्दची घोषणा सभागृहात लवकरच होणार आहे.

## टोलचा झोल! ईडीचे १४ ठिकाणी छापे

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**



देशभरातील अनेक रस्ते आणि महामार्गांवर उभारण्यात येणाऱ्या टोलनाक्यांवरून मोठा घोटाळा होत असल्याची शक्यता आहे. देशातील सुमारे २००हून अधिक टोलनाक्यांवर संशयास्पद व्यवहार होत असल्याचा संशय असून त्या पार्श्वभूमीवर बुधवारी (दि.२) सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) महाराष्ट्रासह देशभरातील सुमारे १४ टोलनाक्यांवर छापे टाकले.

ईडीने टाकलेल्या धाडींमध्ये महाराष्ट्र, उत्तर प्रदेश, राजस्थान, जम्मू-काश्मीर, पश्चिम बंगाल आणि भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण (एनसीआर)मधील टोलनाक्यांचा समावेश आहे. या टोलनाक्यांवरून वेगवेगळ्या मार्गाने आर्थिक गैरव्यवहार सुरू असल्याचा संशय आहे. त्यात ट्रकसारख्या मोठ्या वाहनांना बनावट फास्टॅग लावून फसवणूक करण्यासह खोटे सॉफ्टवेअर तयार करून त्यावरून बनावट पावत्या देण्यासारखे प्रकार उघडकीस आले आहेत. टोलनाक्यावरील कर्मचारी, संचालक आणि आरोपींच्या संगनमतातून हे प्रकार घडत असल्याचे उघडकीस आले आहे.

ईडीच्या म्हणण्यानुसार फॉरेन्सिक तपास आणि एनएचएआयच्या नोंदींमधून अशा सॉफ्टवेअरच्या वापराची पुष्टी झाली आहे. या आधारावर पुढील तपासासाठी ईडीने विविध ठिकाणी छापे टाकले आहेत. याबाबत अधिकाऱ्यांनी सांगितले की, डिजिटल आणि कागदोपत्री पुरावे हस्तगत करणे, या फसवणुकीतून फायदा झालेल्यांना ओळखणे आणि गुन्ह्यातून मिळालेल्या पैशांचा माग काढणे हे छाप्यांचे उद्दिष्ट आहे.

## निवडक

### नेपाळच्या पंतप्रधानांनी मानले भारताचे आभार



**काठमांडू :** नेपाळमध्ये आलेल्या महापुरानंतर बचावकार्यात वेळेवर केलेल्या मदतीबद्दल पंतप्रधान बालेन शाह यांनी भारत आणि चीन या दोन्ही शेजारी देशांचे जाहीर आभार मानले आहेत. दोन्ही देशांनी संकटकाळात तत्काळ मदत सामग्री, तांत्रिक पथके आणि आपत्कालीन यंत्रणा पाठवून मोठे सहकार्य केल्याचे शाह यांनी संसदेला संबोधित करताना नमूद केले.

### राम मंदिर ट्रस्टच्या सीईओपदी जितेंद्र मिश्रा यांची नियुक्ती

**अयोध्या :** प्रशासकीय कामकाज सुव्यवस्थित करण्यासाठी श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र ट्रस्टने निवृत्त एअर मार्शल जितेंद्र मिश्रा यांची आपल्या पहिल्या पूर्णवेळ मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) पदावर नियुक्ती केली आहे. एका उच्चस्तरीय शोध समितीने तीन पात्र उमेदवारांची नावे शॉर्टलिस्ट करून ट्रस्टकडे सादर केली होती, ज्यामधून एअर मार्शल मिश्रा यांची अंतिम निवड करण्यात आली.

## ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांचा मोर्चा आश्वासनानंतर स्थगित



**यवत : प्रतिनिधी**

ओबीसी आरक्षणाच्या संरक्षणासाठी पाटस टोलनाक्यावरून सुरू झालेला ओबीसी जनआक्रोश मोर्चा स्थगित करण्यात आला आहे. पाटस येथून मंगळवारी निघालेला हा मोर्चा बुधवारी (दि.२) सकाळी यवतहून पुन्हा मुंबईच्या दिशेने कूच करत असतानाच ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी आंदोलन स्थगित करत असल्याची घोषणा केली. भाजप प्रदेशाध्यक्ष तथा मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिलेल्या आश्वासनानंतर हा निर्णय घेण्यात आल्याचे हाके यांनी स्पष्ट केले.

लक्ष्मण हाके यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले की, मराठा आरक्षण उपसमिती आणि ओबीसी उपसमिती यांची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत संयुक्त बैठक आयोजित केली जाईल, असे आश्वासन मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले आहे. येत्या १० दिवसांत ही बैठक घडवून आणली जाईल, असे त्यांनी सांगितले. त्याचप्रमाणे सध्या मुंबईत सणासुदीचे दिवस असल्याने नागरिकांची गैरसोय होऊ नये म्हणून मोर्चा स्थगित करण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले होते, ज्याचा आदर करत आम्ही हा निर्णय घेतला आहे.

आपल्या प्रकृतीबद्दल भाष्य करताना लक्ष्मण हाके म्हणाले की, त्यांची प्रकृती सध्या ठीक नसली तरी ते गॅलेक्सी किंवा जहांगीरसारख्या बड्या खासगी रुग्णालयांत उपचारासाठी दाखल होणार नाहीत.

## मराठा आरक्षणासंदर्भात नवीन मसुदा सादर

### ■ मनोज जरांगे यांनी प्रतिसाद द्यावा : मंत्री विखे-पाटील

**छत्रपती संभाजीनगर : प्रतिनिधी**

"मराठा समाजाला न्याय देण्यासाठी राज्य शासनाने वेळोवेळी पावले उचलली आहेत. आता मराठा आरक्षणाबाबत नवीन मसुदा तयार करून पाठवला आहे. त्यास मनोज जरांगे-पाटील यांनी प्रतिसाद द्यावा, म्हणजे पुढील कार्यवाही करता येईल," असे आवाहन मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष तथा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी केले आहे.

राज्यात ज्या ५८ लाख कुणबी नोंदी सापडल्या आहेत, त्यानुसार प्रमाणपत्रे द्यावीत या प्रमुख मागणीसाठी मराठा समाज नेते मनोज जरांगे यांचे गेल्या पाच दिवसांपासून अंतरवाली सराटीत उपोषण सुरू आहे. या पार्श्वभूमीवर बुधवारी (दि. २) मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांच्यासह मंत्री उदय सामंत, आमदार प्रसाद लाड यांनी पत्रकार परिषद घेत सरकारची भूमिका स्पष्ट केली.



यावेळी मंत्री विखे-पाटील म्हणाले की, मराठा समाजाला आरक्षण मिळावे, त्यांना न्याय मिळावा म्हणून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गायकवाड आयोगाची स्थापना केली. पहिल्यांदा १६ टक्के आरक्षण देण्यात आले, मात्र ते आरक्षण दुर्दैवाने महाविकास आघाडी सरकारमध्ये टिकले नाही, परंतु मराठा समाजाला आरक्षण देण्याचा पहिला प्रयत्न फडणवीस यांनी केला. त्यानंतर एकनाथ शिंदे मुख्यमंत्री झाले. त्यांच्या काळात 'एसईबीसी'मध्ये १० टक्के आरक्षण देण्यात आले. यापूर्वी फडणवीस, शिंदे यांच्या व्यतिरिक्त असे प्रयत्न कोणी केले नाहीत.

मराठा समाजासाठी आरक्षण देताना प्रत्येक वेळी इतर कोणत्याही समाजाच्या आरक्षणाला धक्का लागणार नाही याची काळजी घेण्यात आली. आम्ही आता १० ते १७ सप्टेंबर या दिवसांत छत्रपती शिवाजी महाराजस्व अभियान राबवत आहोत. त्यानुसार प्रत्येक मंडळात शिबिरे घेऊन ५८ लाख कुणबी नोंदीमध्ये ज्या लोकांचे अर्ज असतील, त्या संदर्भात नियमाप्रमाणे कार्यवाही केली जाईल. त्यासाठी माहिती संकलित केली असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

'हैदराबाद गॅझेटियर'नुसार कार्यवाहीचे काम सुरू आहे. त्यात साडेतीन हजार अर्ज प्राप्त झाले होते. त्यापैकी ३,३०० प्रमाणपत्र दिले आहेत. वंशावळ समिती पहिल्यांदा नेमण्यात आली. हेल्पलाइनही सुरू केली असल्याचे ते म्हणाले.

मराठा आंदोलकांवरील गुन्हे मागे घेण्याची मागणी जरांगेंनी केली आहे. यावर बोलताना मंत्री विखे-पाटील म्हणाले की, मराठा आंदोलनादरम्यान १,५०९ गुन्हे दाखल झाले आहेत. त्यातील १,३७३ गुन्हे मागे घेतले, तर अपात्र ठरलेले म्हणजे जे गुन्हे मागे घेऊ शकत नाहीत अशी ११८ प्रकरणे आहेत. त्यांची चौकशी सुरू आहे. ९० टक्के गुन्हे मागे घेण्यात आले आहेत. मराठा कक्ष स्थापण्याची मागणीही पूर्ण केली आहे.

मराठा आरक्षणाबाबत सरकार सकारात्मक असल्याची माहिती मंत्री उदय सामंत यांनी दिली. मनोज जरांगे यांच्या प्रकृतीची चिंता सर्वांना आहे, म्हणून शिष्टमंडळ आले आहे. त्यांनीही सकारात्मकता दाखवत मसुदा मान्य केला तर पुढे जाता येईल, असे ते म्हणाले.

## गोपाळकाल्यासाठी रंगीबेरंगी हंड्या बाजारात



**तळा : प्रतिनिधी**

गोपाळकाल्याला दोन दिवस राहिले असल्याने बाजारात रंगीबेरंगी हंड्या दाखल झाल्या आहेत. नागरिक मोठ्या प्रमाणात या हंड्या खरेदी करताना दिसत आहेत.

मातीपासून बनवलेल्या साध्या हंडीला कारागिरांनी आपल्या कौशल्याने एक नवे रूप दिले आहे. या हंड्या अधिक आकर्षक दिसाव्यात यासाठी त्यावर सुंदर रंगरंगोटी, देखणे नक्षीकाम, हिरे, चमचमत्या लेसेस, रंगीबेरंगी टिकल्या, छोटे आरसे आणि आकर्षक गोंडे यांसारख्या साहित्याचा वापर करण्यात आला आहे. सणाच्या निमित्ताने या पारंपरिक मातीच्या हंड्या घडवणाऱ्या आणि त्या सजवणाऱ्या स्थानिक कारागिरांना मोठ्या प्रमाणावर रोजगार उपलब्ध झाला आहे.

यंदा हंड्यांच्या किमतीमध्ये ४० ते ५० रुपयांनी वाढ झाली आहे. मागील वर्षी २०० रुपये किमतीची हंडी आता २५० ते ३०० रुपयांना विकली जात आहे. साईजनुसार हंडीची किंमत ठरते. बाजारात १०० रुपयांपासून ते ५०० रुपयांपर्यंतच्या हंड्या विक्रीसाठी आहेत.

हंडीबरोबरच विविधरंगी दोऱ्या, बासरी, मुकुट, फुगे, तोरणे इत्यादी साहित्यही बाजारात उपलब्ध आहे. तरुणाई हे साहित्य खरेदीकडे वळत असल्याचे चित्र आहे. एकंदर गोपाळकाल्याची लगबग दिसून येत आहे.

## गणेशोत्सवासाठी ५,२२० जादा एसटी बसेस प्रवाशांच्या सेवेत



**मुंबई : प्रतिनिधी**

गणेशोत्सव जवळ येताच मुंबई, ठाणे आणि पालघर परिसरात राहणाऱ्या कोकणवासीयांची गावाकडे जाण्यासाठी मोठी लगबग सुरू झाली आहे. वाढती प्रवासी गर्दी लक्षात घेऊन महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने मोठी तयारी केली आहे.

गणेशोत्सवाच्या काळात कोकणात जाणाऱ्या प्रवाशांना दिलासा देण्यासाठी एसटी महामंडळाकडून ५,२२० जादा बसफेऱ्यांचे नियोजन करण्यात आले आहे. मुंबई, ठाणे आणि पालघर परिसरातून कोकणातील विविध मार्गांसाठी या विशेष बससेवा उपलब्ध करण्यात येणार आहेत. रेल्वेगाड्यांमध्ये मोठी गर्दी आणि तिकिटांसाठी वाढती प्रतीक्षा यादी पाहता एसटी बस हा अनेक प्रवाशांसाठी महत्त्वाचा पर्याय ठरणार आहे.

यंदा मोठ्या गटाने प्रवास करणाऱ्या नागरिकांसाठीही विशेष सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे. किमान ४० प्रवाशांचा गट असल्यास ग्रुप बुकिंगची सुविधा घेता येणार आहे. त्यामुळे एकाच गावातील, परिसरातील किंवा संस्थेतील नागरिकांना एकत्रितपणे प्रवास करणे अधिक सोयीचे होणार आहे.

## सहकारी साखर कारखान्यांसाठी सॉफ्ट लोन योजना

### ■ मंत्रिमंडळासमोर प्रस्ताव सादर करावा -उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील सहकारी साखर कारखान्यांना पुढील गाळप हंगामाच्या पूर्वतयारीसाठी आणि शेतकऱ्यांना एफआरपीची रक्कम वेळेत देण्यास मदत व्हावी या उद्देशाने केंद्र सरकारच्या धर्तीवर राज्यात सॉफ्ट लोन योजना लागू करण्यासंदर्भातील प्रस्ताव तत्काळ मंत्रिमंडळासमोर सादर करावा, असे निर्देश उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी दिले.

सह्याद्री राज्य अतिथीगृह येथे उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या अध्यक्षतेखाली सहकारी साखर कारखान्यांसाठी सॉफ्ट लोन पॉलिसी आणि उपपदार्थ निर्मिती धोरण निश्चित करण्याबाबत बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीला सहकारमंत्री बाबासाहेब पाटील, वित्त विभागाचे अपर मुख्य



सचिव विकासचंद्र रस्तोगी, सहकार व पणन विभागाचे प्रधान सचिव प्रवीण दराडे, उपमुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ. राजेश देशमुख, वित्त विभागाचे सहसचिव माधव वीर, नियोजन विभागाच्या उपसचिव सविता जावळे आदी उपस्थित होते.

साखर कारखान्यांची आर्थिक क्षमता वाढवण्यासाठी केवळ साखरेवर अवलंबून न राहता उपपदार्थांच्या निर्मितीला चालना देणे गरजेचे आहे. या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्र्यांनी सहकारी साखर कारखान्यांमधून तयार होणाऱ्या विविध उपपदार्थांसाठी सर्वसमावेशक धोरण ठरवण्याची सूचना केली. या धोरणामुळे कारखान्यांमध्ये सौरऊर्जा, सहवीज निर्मिती, इथेनॉल(१जी), मल्टिफीड, २जी इथेनॉल, सीबीजी, हरित हायड्रोजन, बायो बिटुमिन, जैव रसायने आणि एसएएफ या घटकांच्या निर्मितीस गती मिळणार आहे.

सॉफ्ट लोन योजनेमुळे साखर कारखान्यांची आर्थिक चणचण दूर होण्यास मदत होईल, शेतकऱ्यांचे एफआरपीचे पैसे वेळेत देणे शक्य होणार आहे तसेच येत्या गाळप हंगामाची पूर्वतयारी विनाअडथळा पूर्ण करता येईल.

# महाराष्ट्र-न्यू साऊथ वेल्स भागीदारीला चालना

## वित्तीय सेवा ते शिक्षणापर्यंत करार



**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र आणि ऑस्ट्रेलियातील न्यू साऊथ वेल्स यांच्यात २०१२ पासून असलेली भागीदारी अधिक व्यापक, महत्त्वाकांक्षी आणि परिणामाभिमुख करण्यात येईल, असा निर्धार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. मुख्यमंत्री फडणवीस आणि न्यू साऊथ वेल्सचे प्रमुख क्रिस मिन्स यांच्या उपस्थितीत वर्षा निवासस्थानी वित्तीय सेवा, स्वच्छ ऊर्जा, प्रगत उत्पादन, महत्त्वपूर्ण खनिजे, कृषी तंत्रज्ञान, आरोग्य, शिक्षण, कौशल्य विकास, तंत्रज्ञान, संस्कृती आणि क्रीडा या क्षेत्रांत सामंजस्य करार करण्यात आला.

ही क्षेत्रे २०४७पर्यंत महाराष्ट्राला विकसित आणि जागतिक स्तरावर स्पर्धात्मक बनविण्याच्या उद्दिष्टाशी सुसंगत असल्याचे फडणवीस यांनी सांगितले. मुंबई आणि सिडनी ही अनुक्रमे भारत आणि ऑस्ट्रेलियाची वित्तीय व व्यावसायिक प्रवेशद्वारे आहेत. त्यामुळे न्यू साऊथ वेल्समधील वित्तीय संस्था, व्यावसायिक सेवा कंपन्या, पायाभूत सुविधा गुंतवणूकदार आणि सुपरॲन्युएशन फंडांनी महाराष्ट्राला भारतातील गुंतवणुकीचे प्रमुख प्रवेशद्वार म्हणून पाहावे, असे आवाहन फडणवीस यांनी केले. राज्यातील वाहतूक पायाभूत सुविधा, औद्योगिक कॉरिडॉर, नागरी विकास, अक्षय ऊर्जा आणि डिजिटल पायाभूत सुविधांमुळे दीर्घकालीन गुंतवणुकीच्या मोठ्या संधी असल्याचे त्यांनी सांगितले.

महाराष्ट्र इलेक्ट्रिक वाहने, बॅटरी, इलेक्ट्रॉनिक्स, सेमीकंडक्टर, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि प्रगत उत्पादन क्षेत्रात सक्षम परिसंस्था उभारत आहे. न्यू साऊथ वेल्सकडील खाण तंत्रज्ञान, महत्त्वपूर्ण खनिजे, स्वच्छ ऊर्जा आणि नवोन्मेषाच्या अनुभवातून बॅटरी उत्पादन, हरित हायड्रोजन, अक्षय ऊर्जा व ऊर्जा साठवणूक क्षेत्रात संयुक्त प्रकल्प विकसित करता येतील, असे फडणवीस म्हणाले. कौशल्य विकासासाठी न्यू साऊथ वेल्सच्या टेक्निकल अँड फर्दर एज्युकेशन आणि महाराष्ट्रातील औद्योगिक संस्था व कौशल्य संस्थांमध्ये संयुक्त अभ्यासक्रम, प्रशिक्षक प्रशिक्षण, डिजिटल शिक्षण आणि उद्योगाशी संलग्न प्रमाणपत्र अभ्यासक्रम राबविण्याची संधी आहे. न्यू साउथ वेल्समधील विद्यापीठांनी नवी मुंबईजवळील आंतरराष्ट्रीय शिक्षण नगरीत सहभागी व्हावे, असे आवाहनही त्यांनी केले.

दरम्यान, न्यू साऊथ वेल्सचा दुष्काळ व्यवस्थापन, शेती आणि जलसंधारणाचा अनुभव मराठवाडा व विदर्भासाठी उपयुक्त ठरू शकतो. कराराच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी ९० दिवसांत संयुक्त कार्यगट स्थापन होणार असून, तो प्रमुख प्रकल्प निश्चित करून जबाबदाऱ्या ठरवेल व प्रगतीचा आढावा घेईल.

# महामार्गालगत विद्यार्थ्यांनी सांभाळली वाहतुकीची धुरा

**पनवेल : वार्ताहर**

महामार्गालगतच्या शाळा-महाविद्यालय परिसरात विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत नवी मुंबई वाहतूक पोलिसांकडून राबविण्यात येत असलेल्या 'वन डे ट्रॅफिक कॉप्स' उपक्रमाला नावडे येथील परशुराम जोमा म्हात्रे हायस्कूलच्या विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. तळोजा वाहतूक शाखेच्या वतीने एनएच-४८ महामार्गालगत नावडे परिसरातील म्हात्रे हायस्कूलसमोर हा उपक्रम राबविण्यात आला.

यावेळी सुमारे ५० आरएसपी विद्यार्थ्यांनी सहभाग घेत वाहतूक व्यवस्थापनाचा प्रत्यक्ष अनुभव घेतला. विद्यार्थ्यांना वाहतूक नियमांचे पालन, सिग्नलचे महत्त्व, सुरक्षितपणे रस्ता ओलांडण्याची पद्धत तसेच



वाहनचालकांनी पादचाऱ्यांना द्यावयाचे प्राधान्य याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. उपक्रमादरम्यान विद्यार्थ्यांनी वाहतूक पोलिसांसोबत महामार्गाच्या दोन्ही बाजूंची वाहतूक सुरक्षितपणे थांबवून शाळकरी मुलांना रस्ता ओलांडून देण्याचे प्रात्यक्षिक केले. त्यामुळे विद्यार्थ्यांना वाहतूक नियमांचा प्रत्यक्ष अनुभव मिळण्याबरोबरच रस्ते सुरक्षेबाबत जनजागृती करण्याची संधी मिळाली.

'वाहतूक नियम प्रत्येक नागरिकाच्या सुरक्षिततेसाठी आहेत,' असा संदेश देण्यात आला. महामार्गालगतच्या शाळांत विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी अशा उपक्रमांची गरज असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले. पोलीस उपायुक्त राहुल खाडे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक चेतना चौधरी तसेच तळोजा वाहतूक शाखेतील अंमलदारांनी हा उपक्रम यशस्वीपणे राबविला.

## निवडक

### रोहिंजण येथे सेंट्रिंग प्लेटची चोरी

**नवीन पनवेल** : रोहिंजण येथून साडेतीन लाख रुपये किमतीच्या ९८ ॲल्युमिनियम सेंट्रिंग प्लेट चोरून नेल्याप्रकरणी तळोजा पोलीस ठाण्यात १ सप्टेंबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ड्रीम मेडोज डेव्हलपर्स, रोहिंजन या नवीन इमारतीच्या साइटवर सेंट्रिंग प्लेट ठेवण्यात आल्या होत्या. अनोळखी इसमाने त्या चोरून नेल्या.

### रिक्षा उलटून महिलेचा मृत्यू

**नवीन पनवेल** : रिक्षा पलटी झाल्याने ३६ वर्षीय संगीता कुणाल पाटील (रा. वरेडी, हमरापूर, पेण) या महिलेचा मृत्यू झाला. या अपघाताप्रकरणी २ सप्टेंबर रोजी ऑटोरिक्षा चालक प्रकाश कृष्णा पाटील (रा. रावे) यांच्याविरोधात पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २७ ऑगस्ट रोजी संगीता पाटील, सरिता गावंड आणि इतर आवरे, ता. उरण येथे गेल्या होत्या. तेथून त्या प्रकाश पाटील यांची ऑटोरिक्षा क्र. एमएच ०६ बीव्ही २११३ मधून घरी येत होत्या. रस्त्यावरील स्पीडब्रेकरवरून रिक्षा अचानक उजव्या बाजूस पलटी झाली. दरवाज्याच्या बाजूला बसलेल्या संगीता पाटील रस्त्यावर पडल्या आणि त्यांच्या डोक्याच्या मागील बाजूस गंभीर दुखापत झाली. रुग्णालयात दाखल केल्यानंतर डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. पेण पोलीस ठाण्यातून हा गुन्हा पनवेल तालुका पोलीस ठाण्यात वर्ग करण्यात आला आहे.

### महिलेवर अत्याचार, आरोपीवर गुन्हा

**नवीन पनवेल** : लग्नाचे आमिष दाखवून अत्याचार केल्याप्रकरणी खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. पीडित महिला आणि आरोपी क्रमांक एक यांचा घटस्फोट झालेला असतानाही आरोपीने पुन्हा लग्नाचे आमिष दाखवून अत्याचार केला. त्यात त्या गर्भवती राहिल्या. त्यानंतर लग्न न करता पीडित महिलेला शारीरिक, मानसिक त्रास देऊन मारहाण केली आणि तिला घराबाहेर काढले. याप्रकरणी तिघांविरोधात खांदेश्वर पोलीस ठाण्यात २ सप्टेंबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### अज्ञात वाहनाच्या धडकेत वृद्धेचा मृत्यू

**नवीन पनवेल** : मुंबई-पुणे जुना हायवे, मुंबई लेन, कोनजवळ ७५ वर्षीय फिरस्ती महिलेला अज्ञात वाहनाने धडक दिली. या धडकेत तिचा मृत्यू झाला. या अपघाताप्रकरणी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात वाहनचालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २ सप्टेंबरला सकाळी सहाच्या सुमारास मुंबई-पुणे जुना हायवे, मुंबई लेन, कोनजवळ बिंदास बारसमोर ही घटना घडली. धडकेत महिला बेशुद्ध झाली आणि तिचा मृत्यू झाला. महिलेची ओळख पटलेली नाही. या महिलेबाबत अधिक माहिती असल्यास पनवेल तालुका पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक गणेश मोकाशी (मो. ८६६८४८१४१४) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### एसीचे युनिट चोरणाऱ्यास अटक

**पनवेल** : करंजाडे परिसरात दोन ठिकाणी एसीचे आऊटडोअर युनिट चोरणाऱ्या आरोपीस पनवेल शहर पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. करंजाडे सेक्टर-३ ई येथील कार्यालयाबाहेर ठेवलेले सुमारे ९९ हजार रुपये किमतीचे लॉयड कंपनीचे नऊ टन क्षमतेचे एसीचे आऊटडोअर युनिट चोरीला गेल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी पनवेल शहर पोलिसांनी एका आरोपीला अटक करून त्याच्याकडून १६ हजार रुपये रोख रक्कम हस्तगत केली आहे. याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली होती. त्यांच्या तक्रारीवरून वपोनि बाळा कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली पोउपनि किरण राऊत, पोहवा योगेश दिवेकर, संदेश म्हात्रे, कराड आदींच्या पथकाने तांत्रिक तपासाच्या आधारे आरोपी नाविद उर्फ नावेद आरिफ शेख (२८) याला अटक केली आहे.

### कृष्ण जन्माष्टमीनिमित्त भजनसेवा

**नवी मुंबई** : कोपरखैरणे गाव, सेक्टर-१९ येथील हनुमान मंदिरात श्रीकृष्ण जन्माष्टमीनिमित्त १ सप्टेंबर रोजी श्री सद्गुरु प्रासादिक भजन मंडळ यांच्या माध्यमातून भजनरूपी सेवा करण्यात आली. यावेळी भजनातील गायकांनी सुमधुर आवाजात श्री राधा-कृष्णचरणी अभंग, गौळण, भक्तिगीते अर्पण करताना त्यांच्या गायनाला उपस्थित भाविकांनी टाळ्यांच्या गजरात भरभरून दाद दिली. त्यामुळे श्री राधा-कृष्णचरणी अर्पण केलेल्या भजनसेवेत सुरेल वातावरण निर्माण झाले. भजनातील रूपेश पाटील (पावणे), दिनेश भोईर यांच्या मृदंगाच्या आवाजाने श्री राधा-कृष्णचरणी भक्तिमय लय पसरली होती.

# गव्हाण विद्यालयात 'एक पेड माँ के नाम' अंतर्गत वृक्षारोपण

**गव्हाण : रामप्रहर वृत्त**

विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संवर्धन, वृक्षारोपण आणि निसर्गाविषयी प्रेमाची भावना रुजविण्याच्या उद्देशाने २९ ऑगस्ट रोजी रयत शिक्षण संस्थेच्या छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेज, गव्हाण-कोपर येथे 'एक पेड माँ के नाम' उपक्रमांतर्गत वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांच्या माता-पालकांनी व विद्यार्थ्यांनी आणलेल्या विविध वृक्षांच्या रोपांची शाळेच्या परिसरात माता-पालकांच्या हस्ते लागवड करण्यात आली. उपक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे प्रत्येक विद्यार्थ्याने आपल्या माता-पालकांच्या सन्मानार्थ लावलेल्या रोपाला संबंधित विद्यार्थी व त्याच्या माता-पालकांचे नाव देण्यात आले. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या मनात वृक्षांशी भावनिक नाते निर्माण होऊन त्यांच्या संगोपनाची जबाबदारी स्वीकारण्याची प्रेरणा मिळाली.

उपक्रमाचे विभागप्रमुख प्रमोद करावकर यांनी उपस्थित माता-पालकांना 'एक पेड माँ के नाम' उपक्रमाची सविस्तर माहिती दिली तसेच



पर्यावरण संवर्धनातील वृक्षांचे महत्त्व स्पष्ट केले. वृक्ष केवळ पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठीच नव्हे, तर भावी पिढीच्या निरोगी व सुरक्षित भविष्यासाठीही अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. उपक्रमास प्राचार्या ज्योत्स्ना ठाकूर, उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे, पर्यवेक्षिका शशिकला पाटील तसेच विद्यालयातील सर्व शिक्षकवृंद यांची प्रमुख उपस्थिती लाभली. माता-पालक, विद्यार्थी आणि शिक्षकांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे उपक्रम प्रेरणादायी वातावरणात पार पडला.

# पनवेलमध्ये सारीपाट स्पर्धेची रंगत

## तरुणांचा उत्स्फूर्त सहभाग

**पनवेल : वार्ताहर**

संस्कृती, परंपरा आणि बंधुभावाची जपणूक करणाऱ्या एकता मित्र मंडळ, लाईन आळी यांच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही पारंपरिक सारीपाट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. स्थानिक हनुमान मंदिरात रंगलेल्या या स्पर्धेला बालकांपासून ज्येष्ठांपर्यंत उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

डिजिटल आणि मोबाइल गेमिंगच्या युगातही तरुणांमध्ये सारीपाट खेळाचा मोठा उत्साह पाहायला मिळाला. गेल्या अनेक वर्षांपासून मंडळाकडून ही परंपरा जपली जात आहे. पट मांडून सोंगट्या आणि कवड्यांच्या साथीने रंगलेल्या सारीपाटाच्या डावात तरुण आणि ज्येष्ठ खेळाडूंमध्ये चुरस, उत्साह आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते. ज्येष्ठांच्या मार्गदर्शनाखाली तरुणांनीही मोठ्या उत्साहाने



सहभाग घेत आपले कौशल्य दाखविले. नव्या पिढीला पारंपरिक खेळांची ओळख व्हावी, जुन्या संस्कृतीशी त्यांचा संवाद कायम राहावा आणि सामाजिक सलोखा व बंधुभाव वाढावा, या उद्देशाने मंडळाकडून हा उपक्रम सातत्याने राबविला जात असल्याचे सांगण्यात आले.

यावेळी लाईन आळीतील नागरिक, मंडळाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि स्थानिक तरुण मोठ्या संख्येने उपस्थित होते. पारंपरिक खेळांच्या माध्यमातून नव्या-जुन्या पिढीतील संवाद वाढतो आणि आपुलकीचे नाते अधिक घट्ट होते, अशी भावना उपस्थित नागरिकांनी व्यक्त केली. एकता मित्र मंडळाच्या या उपक्रमाचे तसेच तरुणांच्या उत्स्फूर्त सहभागाचे परिसरात कौतुक होत आहे.

# व्यसनमुक्ती पथनाट्य स्पर्धेत विवेकानंद महाविद्यालय प्रथम

**नवी मुंबई : बातमीदार**

अन्वय प्रतिष्ठान आणि नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने १ सप्टेंबर रोजी विष्णुदास भावे नाट्यगृह, वाशी येथे पथनाट्य स्पर्धा आयोजित करण्यात आली. या स्पर्धेचे हे दहावे वर्ष आहे. मुंबई, नवी मुंबई, ठाणे, रायगड परिसरातील एकूण १३ महाविद्यालयांनी यात सहभाग घेतला.

स्पर्धेत विवेकानंद कॉलेज ऑफ आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स, चेंबूरने प्रथम पारितोषिक, एसआयईएस कॉलेज ऑफ आर्ट्स, सायन्स, कॉमर्स (सीनियर कॉलेज)ने द्वितीय पारितोषिक, तर डी. वाय. पाटील स्कूल ऑफ फार्मसीने तृतीय पारितोषिक पटकावले. स्वामी विवेकानंद ज्युनिअर कॉलेज, चेंबूर तसेच एफ. जी. नाईक कॉलेज ऑफ आर्ट्स, कॉमर्स, सायन्स,



कोपरखैरणे यांना उत्तेजनार्थ पारितोषिक देण्यात आले. विविध महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनी आपल्या पथनाट्यातून व्यसनांची एक प्रयोग, मोठ्यांचे अनुकरण करत अवलंबित्व आल्यानंतर भोगावे लागणारे दुष्परिणाम आणि त्यातून व्यक्तीची आणि कुटुंबाची होणारी वाताहत, शेवटी त्यावर उपायही सांगण्याचा प्रयत्न केला.

'व्यसन सोडा, जीवन जोडा' हा विषय देण्यात आला होता. त्या अनुषंगाने जीवनावर प्रेम करा, हाच संदेश या सर्व नाटिकांतून देण्यात आला. अशा प्रकारच्या स्पर्धा या जेन झीला विधायक मार्गाकडे नेण्यासाठी उपयुक्त ठरतील, असे राजेंद्र घरत आपल्या मनोगतात म्हणाले. नशाबंदी मंडळाचे चिटणीस अमोल मडामे म्हणाले की, आपल्या समाजातील खरे नायक जे आहेत, त्यांच्याकडून प्रेरणा घेतली पाहिजे. या स्पर्धेचे परीक्षक म्हणून ज्येष्ठ रंगकर्मी रवि वाडकर तसेच अभिनेत्री प्रीतम सिंग यांनी काम पाहिले.

यावेळी विचारमंचावर नवी मुंबई समन्वय संस्थेच्या सचिव अमरजा चव्हाण, स्त्री मुक्ती संघटनेच्या विश्वस्त वृषाली मगदूम उपस्थित होत्या. विजेत्या महाविद्यालयीन संघांनी जोशपूर्ण वातावरणात मंचावर येऊन आपापली पारितोषिके स्वीकारली. प्रास्ताविकात डॉ. अजित मगदूम यांनी स्पर्धा घेण्यामागचा उद्देश स्पष्ट केला. अनिल लाड यांनी विजेत्यांची नावे जाहीर केली. सूत्रसंचालन अन्वयचे वरिष्ठ समुपदेशक उदय तिळवे यांनी केले. कार्यक्रमास साईनाथ हायस्कूलचे विद्यार्थी उपस्थित होते.

### कामोठ्यात तरुणीचा मोबाइल हिसकावला

**नवीन पनवेल** : कॉलेजला जाणाऱ्या तरुणीच्या हातातील मोबाइल चोरून नेल्याप्रकरणी १ सप्टेंबर रोजी दोघांविरोधात कामोठे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. सकाळी पावणेआठच्या सुमारास फिर्यादी कॉलेजला जाण्यासाठी ब्लू डार्ट स्टोअरसमोर, सेक्टर सहा, कामोठे येथे हातात मोबाइल घेऊन उभ्या होत्या. यावेळी दुचाकीवरून आलेल्या दोन अनोळखी इसमांनी त्यांच्या हातातील मोबाइल हिसकावून पलायन केले.

# महात्मा फुले महाविद्यालयात प्रजासत्ताकपूर्व संचलन निवड चाचणी



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मुंबई विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना कक्ष व महात्मा फुले कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने रायगड जिल्हास्तरीय राष्ट्रीय सेवा योजनेची प्रजासत्ताकपूर्व संचलन निवड चाचणी रयत शिक्षण संस्थेच्या महात्मा फुले महाविद्यालयात उत्साहात संपन्न झाली. या निवड चाचणीमध्ये जिल्ह्यातील विविध महाविद्यालयांतील विद्यार्थी सहभागी झाले होते.

कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर, राष्ट्रीय सेवा योजनेचे जिल्हा समन्वयक प्रा. प्रवीण गायकवाड, विभागीय समन्वयक प्रा. राम बरकुळे, प्रा. अनिल झेंडे, प्रा. तुकाराम माळवे, प्रा. दत्ता हिंगमिरे, एनसीसी कॅप्टन रामदास जमनुके उपस्थित होते. उद्घाटनप्रसंगी प्रास्ताविकामध्ये प्रा. प्रवीण गायकवाड यांनी प्रजासत्ताकपूर्व संचलन निवड चाचणीचा उद्देश, स्वरूप, महत्त्व, नियम व ही चाचणी यशस्वी करण्यासाठी आवश्यक असणारी कौशल्ये याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर यांनी मुंबई विद्यापीठाने महाविद्यालयास आयोजनाची संधी दिल्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. जिल्हा, विद्यापीठ, राज्य व राष्ट्रस्तरावर पोहोचण्यासाठी ध्येय, मेहनत, चिकाटी आणि राष्ट्रीय सेवा योजनेची स्वातंत्र्य, समता, बंधुता, सहानुभूती ही मूल्ये अंगीकारण्याचे आवाहन त्यांनी केले.

निवड चाचणीदरम्यान एनसीसी कॅप्टन रामदास जमनुके यांनी विद्यार्थ्यांची उंची, वजन, शारीरिक सुदृढता, कवायतीचे ज्ञान, संचलन कौशल्य, संवाद कौशल्य, व्यक्तिमत्त्व, गुणवत्ता व मुलाखतीतील प्रावीण्य आदी बाबींचा विचार करून निवड केली. कार्यक्रमाचा समारोप मान्यवरांच्या उपस्थितीत झाला. यावेळी सर्व सहभागी विद्यार्थ्यांचे कौतुक करण्यात आले व प्रावीण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. सूत्रसंचालन डॉ. रूपश्री ठाकूर यांनी, तर आभार प्रा. वैभव जगझाप यांनी मानले.

पान १ वरुन

### शासकीय योजना-धोरणांचे होणार मूल्यमापन

महा-टॅकच्या माध्यमातून केवळ योजनांची नियमांनुसार अंमलबजावणी झाली की नाही, याची तपासणी करण्याऐवजी 'लाभार्थ्यांपर्यंत लाभ' आणि 'खर्चातून परिणाम' या दोन्ही बाबींवर लक्ष केंद्रित केले जाणार आहे. त्यामुळे राज्य शासनाच्या धोरणनिर्मितीपासून ते खर्च व्यवस्थापनापर्यंत डेटा-आधारित निर्णयप्रक्रियेला अधिक बळ मिळणार आहे.

हा कक्ष मुख्यमंत्री कार्यालय, मुख्य सचिव आणि निवृत्त सचिवांच्या उच्चाधिकार समितीला उत्तरदायी राहणार असल्याने योजनांच्या परिणामांचे स्वतंत्र आणि वस्तुनिष्ठ मूल्यमापन होण्यास मदत होईल. या तांत्रिक टीमच्या माध्यमातून उपलब्ध माहितीचे विश्लेषण, फिल्ड सर्वेक्षण, योजनांच्या परिणामांचे मूल्यमापन आणि शासनाला आवश्यक सुधारणा व निर्णयांसाठी तांत्रिक सहाय्य उपलब्ध करून दिले जाणार आहे, अशी माहिती सादरीकरण्याच्या माध्यमातून देण्यात आली.

**निर्णय प्रक्रियेला गती देण्यासाठी १३ सशक्त अभियान**

महा-टॅकच्या माध्यमातून शासनाच्या २५ प्रमुख धोरणांचे विश्लेषण करण्यात येणार आहे. विविध विभागांच्या योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीतील अडथळे ओळखून ते दूर करण्यासाठी तसेच निर्णय प्रक्रियेला गती देण्यासाठी १३ सशक्त अभियान स्थापन करण्यात येणार आहेत. लॉजिस्टिक्स आणि मेरीटाईम यांसारख्या महत्त्वपूर्ण क्षेत्रांचाही या अभियानांमध्ये समावेश असेल. या अभियानांची उद्दिष्टे निश्चित करण्यापासून ते अंमलबजावणीतील त्रुटी दूर करण्यासाठी आवश्यक अधिकार निश्चित करण्यापर्यंतची प्रक्रिया मंत्रिमंडळाच्या मंजुरीने करण्यात येणार आहे.

# चिमुकल्यांकडून आसाम पूरग्रस्तांना मदत



**मुंबई : प्रतिनिधी**

'द नर्चरिंग रूट्स' या नर्सरी शाळेच्या वतीने रक्षाबंधनानिमित्त राबविण्यात आलेल्या उपक्रमातून जमा झालेली रक्कम आसाममधील पूरग्रस्तांच्या मदतीसाठी मुख्यमंत्री मदत निधीत जमा करण्यात आली. या उपक्रमाला पालक आणि चिमुकल्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत सामाजिक बांधिलकी जपली. मुलांमध्ये दया, करुणा, सहकार्य आणि समाजासाठी योगदान देण्याची भावना निर्माण व्हावी, हा या उपक्रमामागील उद्देश असल्याचे 'द नर्चरिंग रूट्स'च्या टीमने सांगितले.

# नवीन पनवेलमध्ये दहीहंडीचा थरार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्रीकृष्ण जन्माष्टमीचे औचित्य साधून नवीन पनवेल येथे 'अस्मिता कला, क्रीडा व सांस्कृतिक मित्र मंडळ' आणि 'प्रियदर्शिनी महिला मंडळ' यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी (दि. ५) 'भव्य दहीहंडी उत्सव २०२६'चे आयोजन करण्यात आले आहे. या उत्सवाच्या माध्यमातून पारंपरिक दहीहंडीची संस्कृती, सामाजिक एकोपा आणि गोविंदा पथकांच्या उत्साहाला प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

दहीहंडी उत्सवात सहभागी होणाऱ्या गोविंदा पथकांसाठी एकूण दोन लाख २२ हजार २२२ रुपयांची आकर्षक



बक्षिसे ठेवण्यात आली आहेत. त्यामुळे परिसरातील तसेच पनवेल शहरातील गोविंदा पथकांमध्ये उत्सुकता निर्माण

## एकूण सव्वादोन लाखांची बक्षिसे

झाली आहे. के. ई. एस. बांठिया हायस्कूल, नवीन पनवेल येथे दहीहंडी उत्सव आयोजित करण्यात आला आहे. पारंपरिक वेशभूषा, ढोल-ताशांचा गजर, गोविंदा पथकांचा उत्साह आणि 'गोविंदा रे गोपाळा, यशोदेच्या तान्ह्या बाळा'च्या जयघोषात हा उत्सव उत्साहपूर्ण वातावरणात साजरा होणार आहे.

उपक्रमाच्या माध्यमातून महिला सहभाग, सांस्कृतिक जतन आणि सामाजिक एकात्मता यांना विशेष महत्त्व देण्यात आले आहे. दहीहंडी उत्सवात नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन गोविंदा पथकांचा उत्साह वाढवावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे. या उत्सवाचा नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजक माजी नगरसेविका सुशीला जगदीश घरत तसेच नगरसेविका डॉ. अस्मिता जगदीश घरत यांनी केले असून अधिक माहितीसाठी सचिन पाटील ९७०२७७६६६६, प्रशांत आवळे ९३२०८७१४६६ किंवा संदीप पाटील ९७६९४०९१४८ या क्रमांकावर संपर्क साधावा, असेही आयोजक मंडळाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांकडून कळविण्यात आले आहे.

# उलव्यात परदेशी नोकरीच्या नावाखाली तरुणांची फसवणूक

**पनवेल : वार्ताहर**

परदेशात नोकरी, आकर्षक पगार आणि दोन वर्षांच्या वर्क परमिटचे आमिष दाखवून सहा बेरोजगार तरुणांची फसवणूक केल्याचा प्रकार उलवे येथे उघडकीस आला आहे. टुरिस्ट व्हिसावर उझबेकिस्तानमध्ये पाठविल्यानंतर तरुणांना नोकरी देण्याऐवजी बांधकामाच्या ठिकाणी काम करण्यास भाग पाडल्याचा आरोप आहे.

संजीतकुमार सिंह, विजय सिंह, लालचंद राजू आणि एजंट रामसजन यादव ऊर्फ बबलू यादव अशी गुन्हा दाखल झालेल्या आरोपींची नावे आहेत. आरोपींनी उलवे येथील खारकोपर रेल्वे स्थानकाजवळील सद्भावना सोसायटीत एस. एम. प्लेसमेंट एलएलपी आणि महाकाल मरीन रिक्रुटमेंट प्रा. लि. या नावाने कार्यालये सुरू केली होती. याप्रकरणी उलवे पोलीस ठाण्यात चौघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपींनी सहा तरुणांना दरमहा ५५० डॉलर पगार आणि दोन




वर्षांचे वर्क परमिट मिळवून देण्याचे आमिष दाखविले. त्यासाठी प्रत्येक तरुणाकडून एक लाख २० हजार रुपये घेतल्याचे तक्रारीत नमूद आहे.

त्यानंतर १६ डिसेंबर २०२५ रोजी या तरुणांना टुरिस्ट व्हिसावर कझाकिस्तानमार्गे उझबेकिस्तानची राजधानी ताश्कंद येथे पाठविण्यात आले, मात्र ताश्कंद येथे पोहोचल्यानंतर संबंधित तरुणांना आश्वासन दिलेल्या कंपनीत नोकरी देण्यात आली नाही. त्याऐवजी त्यांना इमारतींच्या बांधकामाच्या ठिकाणी नेऊन सुमारे दोन महिने मजुरी करण्यास भाग पाडल्याचा आरोप आहे. या काळात त्यांच्या कामाच्या मोबदल्यापोटी मिळालेले ६,६०० डॉलर म्हणजेच सुमारे साडेपाच लाख रुपये आरोपी विजय सिंह याने परस्पर लाटल्याचे तक्रारीत म्हटले आहे. परतीच्या तिकिटासाठी पैसे नसल्याने तरुणांना आणखी १५ दिवस हलाखीच्या परिस्थितीत मजुरी करावी लागली.

त्यानंतर पाच तरुण भारतात परतले, मात्र स्वपन सरकार हा तरुण व्हिसाची मुदत संपल्यामुळे अद्याप उझबेकिस्तानमध्ये अडकून पडल्याचे तक्रारीत नमूद आहे. भारतात परतल्यानंतर पीडित तरुणांनी उलवे येथील आरोपींच्या कार्यालयात जाऊन जाब विचारला. त्यावेळी आरोपींनी शिवीगाळ करून त्यांना हाकलून दिल्याचा आरोप आहे. अखेर पीडितांनी उलवे पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

तक्रारीच्या आधारे पोलिसांनी चौघांविरोधात गुन्हा दाखल केला असून परदेशी नोकरीच्या आमिषाने आणखी कोणाची फसवणूक झाली आहे का? तसेच या प्रकरणामागे आणखी कोणाचा सहभाग आहे याचा तपास सुरू आहे.

# पनवेल वलपमधून १२ वर्षीय मुलाचे अपहरण : गुन्हा दाखल

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल तालुका पोलीस ठाण्याच्या हद्दीतील वलप, साईनगर परिसरातून १२ वर्षीय मुलगा घरातून बेपत्ता झाल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी मुलाच्या आईने दिलेल्या तक्रारीवरून अज्ञात व्यक्तीविरोधात अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार किरणदेवी पिंटू वर्मा (३५) या साईनगर, वलप, पो. पडघे, ता. पनवेल येथे राहतात. त्या बाथरूमसाठी गेल्या असताना आणि त्यांचे दीर अजयकुमार किराणा दुकानात गेले असताना त्यांचा मुलगा युवराज पिंटू वर्मा (१२) याला कोणीतरी अज्ञात व्यक्तीने फूस लावून कायदेशीर पालकांच्या संमतीशिवाय पळवून नेल्याचे तक्रारीत म्हटले आहे. युवराजचे वर्णन सावळा वर्ण, सडपातळ बांधा, उंची सुमारे चार फूट, काळे केस व काळे डोळे असे असून तो लाल रंगाचा टी-शर्ट आणि हिरव्या रंगाची हाफ चड्डी परिधान करून घराबाहेर पडला आहे.

त्याच्याकडे सायकलही असल्याचे पोलीस नोंदीत नमूद आहे. याप्रकरणी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात तक्रार दाखल होताच मुलाचा शोध सुरू करण्यात आला आहे.

## बेकायदा दारूविक्री प्रकरणात एकावर कारवाई

**पनवेल** : पनवेल शहर पोलिसांनी पनवेल परिसरात बेकायदा दारू विक्री करणाऱ्या एका व्यक्तीविरोधात कारवाई केली आहे. पोलिसांनी केलेल्या कारवाईत २० प्लास्टिक बाटल्यांमध्ये भरलेली १०० मिली क्षमतेची जीएम संत्रा कंपनीची दारू जप्त करण्यात आली असून जप्त मुद्देमालाची किंमत ८०० रुपये असल्याची नोंद आहे. याप्रकरणी उपेंद्रकुमार साकेत याच्याविरोधात कारवाई करण्यात आली आहे.

# गव्हाण विद्यालयात दहावी, बारावी बोर्ड परीक्षेचे फॉर्म भरण्यास प्रारंभ

**गव्हाण : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेज, गव्हाण-कोपर येथे बुधवारी (दि. २) इयत्ता दहावी एसएससी व बारावी एचएससी बोर्ड परीक्षा २०२७ साठीच्या आवेदनपत्र भरण्याच्या प्रक्रियेचा शुभारंभ उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आला.

विद्यालयाच्या स्थानिक स्कूल कमिटीचे ज्युनिअर कॉलेज विभागाचे चेअरमन वाय. टी. देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमास स्कूल कमिटीचे चेअरमन अरुणशेठ भगत, अनंताशेठ ठाकूर, विश्वनाथ कोळी, विजयशेठ घरत, ॲड. राहुल घरत, किशोर पाटील, प्राचार्या ज्योत्स्ना ठाकूर, उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे, रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य रवींद्र भोईर, पर्यवेक्षिका शशिकला पाटील, लाईफ वर्कर देवेंद्र म्हात्रे, ज्युनिअर कॉलेज विभागप्रमुख प्रा. संजय उगले यांच्यासह शिक्षक व सेवकवर्ग उपस्थित होता.

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते प्रतिमा पूजनाने करण्यात आली. उपस्थित मान्यवरांचे विद्यालयाच्या वतीने स्वागत करण्यात आले. त्यानंतर ज्युनिअर कॉलेज विभागप्रमुख प्रा. संजय उगले यांनी



प्रास्ताविक करताना दहावी व बारावीच्या बोर्ड परीक्षेच्या दृष्टीने आवेदनपत्र भरण्याची प्रक्रिया, त्याचे महत्त्व तसेच विद्यार्थ्यांनी आवश्यक कागदपत्रे व वैयक्तिक माहिती अचूकपणे भरण्याची गरज याबाबत माहिती दिली. यावेळी दहावीचे वर्गशिक्षक संदीप भोईर यांनी विद्यार्थ्यांना बोर्ड परीक्षेचे आवेदनपत्र कशा पद्धतीने भरावे, अर्ज भरताना कोणती काळजी घ्यावी, वैयक्तिक माहिती, विषयांची नोंद तसेच इतर आवश्यक बाबी तपासून घेण्याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष वाय. टी. देशमुख यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना आवेदनपत्राचे महत्त्व स्पष्ट केले. दहावी व बारावीच्या परीक्षा या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक जीवनातील महत्त्वाचा टप्पा असून या परीक्षांकडे गांभीर्याने पाहून नियोजनबद्ध अभ्यास करण्याचे आवाहन त्यांनी केले. आवेदनपत्र भरताना प्रत्येक विद्यार्थ्याने आपली माहिती काळजीपूर्वक तपासावी आणि आगामी परीक्षेच्या तयारीला आतापासूनच योग्य दिशा द्यावी, असा सल्लाही त्यांनी दिला. यानंतर मान्यवरांच्या हस्ते इयत्ता दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांना बोर्ड परीक्षा २०२७ ची आवेदनपत्रे प्रदान करण्यात आली.

प्राचार्या ज्योत्स्ना ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम यशस्वीरीत्या संपन्न झाला. आभार प्रदर्शन रवींद्र भोईर यांनी केले. शिक्षक, विद्यार्थी व सेवकवर्गाच्या सहकार्याने कार्यक्रमाची सांगता झाली. दहावी-बारावीच्या विद्यार्थ्यांच्या बोर्ड परीक्षेच्या शैक्षणिक प्रवासाची अधिकृत सुरुवात कार्यक्रमामुळे झाली असून विद्यार्थ्यांनी उत्तम यश संपादन करावे यासाठी शिक्षकवर्गाने त्यांना शुभेच्छा दिल्या.

# रिक्षा परमिटसाठी लाच घेणारा एजंट गजाआड

**पनवेल : वार्ताहर**

रिक्षाचे परमिट नावावर करण्यासाठी शासकीय शुल्काव्यतिरिक्त स्वतःसाठी आणि लोकसेवकाच्या नावाने चार हजार ५०० रुपयांची लाच मागून ती स्वीकारताना आरटीओ एजंट विलास गणपती सनगर (६२) यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या नवी मुंबई पथकाने मंगळवारी रंगेहाथ ताब्यात घेतले.

खारघर आरटीओ कार्यालयासमोरील रस्त्यावर दुपारी १.५६ वाजता ही कारवाई करण्यात आली. तक्रारदार हे वाहन चालविण्याचे प्रशिक्षण देणारे विद्यालय चालवतात. प्राप्त अधिकारपत्राच्या आधारे रिक्षाचे परमिट नावावर करण्यासाठी त्यांनी खारघर आरटीओ एजंट विलास सनगर यांच्याशी संपर्क साधला होता. त्यावेळी संबंधित प्रक्रियेसाठी २५ हजार ७०० रुपये शासकीय शुल्क असल्याचे सांगण्यात आले, मात्र या शुल्काव्यतिरिक्त स्वतःसाठी आणि लोकसेवकासाठी मिळून आणखी चार हजार ५०० रुपयांची लाच मागण्यात आली. लाचेची मागणी झाल्यानंतर तक्रारदाराने ११ ऑगस्ट रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दाखल केली. विभागाने तक्रारीची पडताळणी केली असता सनगर यांनी लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर सापळा रचून कारवाई करण्याचे नियोजन करण्यात आले. १ सप्टेंबर रोजी खारघर आरटीओ कार्यालयासमोरील रस्त्यावर सापळा रचण्यात आला. पंचांसमक्ष चार हजार ५०० रुपयांची लाच स्वीकारताच एसीबीच्या पथकाने विलास सनगर यांना ताब्यात घेतले. या कारवाईमुळे आरटीओ कार्यालयाच्या परिसरात खळबळ उडाली. याप्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियमातील कलम ७(अ) अन्वये गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरू असून या प्रकरणाचा पुढील तपास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून करण्यात येत आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक शिवराज पाटील आणि अपर पोलीस अधीक्षक भागवत सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. पोलीस निरीक्षक निता भासेले यांनी सापळा अधिकारी म्हणून जबाबदारी पार पाडली. पोलीस उपअधीक्षक धर्मराज सोनके यांच्या पर्यवेक्षणाखाली पथकातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी ही कारवाई यशस्वी केली.

# पनवेलमधील दि. बा. पाटील विद्यालयात शॉर्टसर्किट

## कर्मचाऱ्यांच्या सतर्कतेमुळे दुर्घटना टळली

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल येथील लोकनेते दि. बा. पाटील विद्यालयात रात्री साडेदहाच्या सुमारास मुख्य वीजपुरवठा पॅनलमध्ये अचानक शॉर्टसर्किट झाल्याची घटना घडली, मात्र सुरक्षा रक्षक, शाळेतील कर्मचारी, महापालिका कर्मचारी आणि अग्निशमन दलाच्या तत्परतेमुळे संभाव्य मोठा अनर्थ टळला.

मुख्य वीज पॅनलमध्ये शॉर्टसर्किट झाल्याचे सुरक्षा रक्षकाच्या निदर्शनास येताच त्यांनी प्रसंगावधान राखून तत्काळ इतर कर्मचाऱ्यांना माहिती दिली. घटनेची माहिती मिळताच महापालिकेचे कर्मचारी व इलेक्ट्रीशियन घटनास्थळी दाखल झाले आणि मुख्य वीजपुरवठा तातडीने बंद करण्यात आला. त्यामुळे शॉर्टसर्किटमुळे आग पसरण्याचा तसेच पुढील धोका निर्माण होण्याची शक्यता टळली.

दरम्यान, घटनेची माहिती मिळताच महापालिकेचे अग्निशमन दलही तातडीने घटनास्थळी पोहोचले. अग्निशमन दलाच्या जवानांनी संपूर्ण परिसराची पाहणी करून परिस्थिती नियंत्रणात असल्याची खात्री केली. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी किंवा मोठे नुकसान झाले नाही.



# स्वस्त तिकिटाच्या आमिषाने तरुणीला ९६ हजारांचा गंडा

**पनवेल : प्रतिनिधी**

स्पेनला जाणाऱ्या भावासाठी तिकीट शोधणाऱ्या पनवेलच्या तरुणीला सायबर भामट्याने गंडा घातल्याचा प्रकार समोर आला आहे. उच्च शिक्षणासाठी स्पेनला जाणाऱ्या भावासाठी आणि त्याच्या मित्रांसाठी ऑनलाइन विमान तिकिटे शोधणाऱ्या तरुणीला सायबर भामट्याने ९६ हजार २२० रुपयांचा गंडा घातला. कमी दरात विमानाची तिकिटे उपलब्ध करून देण्याचे आमिष दाखवून भामट्याने पैसे उकळले आणि त्यानंतर बनावट विमान तिकिटे ई-मेलवर पाठविल्याचे उघडकीस आले आहे.

पनवेल परिसरात राहणाऱ्या तक्रारदार तरुणीचा भाऊ आणि त्याचे मित्र उच्च शिक्षणासाठी स्पेनला जाणार होते. त्यासाठी तरुणी आणि तिचे वडील ऑनलाइन माध्यमातून विमानाची तिकिटे शोधत होते. याचाच फायदा घेत एका सायबर भामट्याने प्रवीण तिवारी नावाने त्यांच्याशी संपर्क साधला. भामट्याने अत्यंत कमी दरात स्पेनची विमान तिकिटे उपलब्ध करून देण्याचे आमिष दाखविले. त्याच्यावर विश्वास ठेवून तरुणीने व्हॉट्सॲपद्वारे तिकिटांसाठी आवश्यक असलेली माहिती



त्याला पाठविली. त्यानंतर भामट्याने सांगितलेल्या बँक खात्यात तक्रारदारांनी एकूण ९६ हजार २२० रुपये ऑनलाइन वर्ग केले.

पैसे मिळाल्यानंतर भामट्याने तक्रारदारांच्या ई-मेलवर विमानाची तिकिटे पाठविली, मात्र तिकिटांची अधिकृत पद्धतीने पडताळणी केली असता सर्व तिकिटे बनावट असल्याचे समोर आले. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर तरुणीने सायबर पोर्टलवर तक्रार दाखल केली. या तक्रारीआधारे पनवेल शहर पोलिसांनी अज्ञात सायबर भामट्याविरोधात फसवणूक आणि माहिती-तंत्रज्ञान कायद्यान्वये गुन्हा दाखल केला असून आरोपीचा शोध सुरू केला आहे.



**पनवेल** : येथील प्रेम विवेक जगे याने कंपनी सेक्रेटरी परीक्षेत उज्ज्वल यश संपादित केले. याबाबत त्याचे वैश्य वाणी समाज, मित्र परिवार आणि इतरांकडून अभिनंदन केले जात आहे. व्यावसायिक विवेक मधुकर जगे यांचा मुलगा प्रेम जगे याने सीएस परीक्षेत यश संपादित केले. या यशाबद्दल पनवेल तालुका वैश्य समाज मंडळाकडून त्याचा सत्कार करण्यात आला. यावेळी अध्यक्ष सुनील शेटे, माजी अध्यक्ष महेंद्र फके, उत्तम वाणी, विकास ठकेकर, दिलीप फके, मनोहर अस्वले तसेच महिला अध्यक्ष पूजा साखरे, सीमा भोपतराव, चार्टर्ड अकाउंटंट अतुल शेटे, अश्विनी शेटे यांनी त्याचे अभिनंदन केले.

# 'सीकेटी'त पर्यावरणपूरक गणेशमूर्ती स्पर्धा उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर विद्यालय, इंग्रजी माध्यम प्राथमिक विभागातर्फे बुधवारी (दि. २) कब-बुलबुल युनिटतर्फे मुख्याध्यापिका निलिमा शिंदे तसेच कब-बुलबुल युनिटचे प्रमुख सुरेंद्र ठमके यांच्या मार्गदर्शनाखाली पर्यावरणपूरक गणेशमूर्ती निर्मिती स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. पर्यावरण संवर्धनाचा संदेश विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवणे तसेच त्यांच्यामध्ये सर्जनशीलता, कलात्मकता व पर्यावरणाबद्दल



जागरूकता निर्माण करणे हा उपक्रमाचा मुख्य उद्देश होता.

उपक्रमात विद्यार्थ्यांनी पर्यावरणपूरक साहित्याचा वापर करून सुंदर व आकर्षक गणेशमूर्ती तयार केल्या. स्पर्धेत विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने आणि कल्पकतेने सहभाग घेतला. संगीत शिक्षक रुपेश मढवी तसेच संतोष खरे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी कब-बुलबुल प्रार्थनेचे सुरेल आवाजात सादरीकरण करून वातावरण मंगलमय केले. कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन अनघा भोसले यांनी केले, तर स्नेहल कडव यांनी स्पर्धेचे परीक्षण काटेकोरपणे केले.

कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून मुख्याध्यापिका निलिमा शिंदे, पूर्व प्राथमिक विभागाच्या पर्यवेक्षिका वैशाली परधी आणि कब-बुलबुल युनिटचे प्रमुख सुरेंद्र ठमके, शिक्षिका बिना नायर, प्रिया नायर, लता बालसुब्रमणीयन तसेच दयानंद ठाकूर उपस्थित होते. शिक्षकांच्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांनी आपल्या कलाकृतींतून पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचा सुंदर संदेश दिला.

## संपादकीय

# भारताचा विकासरथ

भारताने नोंदवलेला ७.८ टक्के विकास दर हा केवळ आर्थिक आकडा नाही. तो भारताच्या आत्मविश्वासाचा आणि संकटांवर मात करण्याच्या सामर्थ्याचा संदेश आहे. जग अनिश्चिततेच्या टप्प्यातून जात असताना भारतीय अर्थव्यवस्थेने नोंदवलेला हा विकास दर नक्कीच विशेष महत्त्वाचा ठरतो.

**अमेरिका आणि इराणमधील युद्धाचे परिणाम त्या दोन देशांच्या सीमा ओलांडून पलीकडे जाणारे आहेत. ऊर्जा, व्यापार, वाहतूक आणि पुरवठा साखळी यांच्यावर त्याचे परिणाम होत असल्याचे अवघे जग अनुभवते आहे. आधीच गंभीर स्वरुपाच्या आर्थिक आव्हानांना तोंड देणाऱ्या जगासमोर या नव्या संकटाने मोठ्या अनिश्चिततेची भर घातली आहे. अशा परिस्थितीत भारताने आपल्या विकासाची गती कायम ठेवणे ही निश्चितच कौतुकास्पद बाब आहे. कच्च्या तेलाच्या वाढत्या किमती आणि अमेरिका-इराण संघर्षासारख्या गंभीर जागतिक घडामोडींनंतरही भारतीय अर्थव्यवस्थेने पुन्हा एकदा आपली ताकद दाखवून दिली आहे. चालू आर्थिक वर्ष २०२६-२७ च्या पहिल्या तिमाहीत म्हणजे एप्रिल ते जून दरम्यान भारताचा विकास दर अर्थात जीडीपी ७.८ टक्के इतका नोंदवला गेला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्हिडिओ संदेशाद्वारे या कामगिरीबद्दल देशवासीयांचे अभिनंदन केले. त्यांच्या संदेशातून या यशाकडे निव्वळ सरकारची कामगिरी म्हणून नव्हे तर प्रत्येक भारतीयाच्या परिश्रमाचे फलित म्हणून पाहण्याची भावना व्यक्त झाली. भारताची ही आर्थिक वाटचाल जगाचे लक्ष वेधून घेते आहे. एकेकाळी जागतिक संकटांचा मोठा परिणाम होणारी भारतीय अर्थव्यवस्था आज बाह्य धक्के सहन करण्याची क्षमता दाखवते आहे. देशांतर्गत बाजारपेठेची ताकद, तरुणांची ऊर्जा, उद्योजकतेला मिळणारे प्रोत्साहन, वेगाने विस्तारत असलेली डिजिटल व्यवस्था आणि पायाभूत सुविधांमध्ये होत असलेली गुंतवणूक यामुळे भारताने स्वतःच्या विकासाची भक्कम पायाभरणी केली आहे. ही कामगिरी सरकारच्या धोरणांवरील जनतेचा प्रगाढ विश्वासही दर्शवते. गेल्या काही वर्षांत भारताने 'आत्मनिर्भर भारत' या संकल्पनेला केवळ घोषणेपुरते न ठेवता उत्पादन, तंत्रज्ञान, पायाभूत सुविधा आणि नवउद्योजकतेच्या माध्यमातून तिला व्यापक रूप देण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळेच जगातील परिस्थिती भारताच्या नियंत्रणाबाहेर असली तरी त्या परिस्थितीचा सामना करण्याची सज्जता भारताच्या ठायी आहे. दुर्दैवाने अशा आशादायी वातावरणातही विरोधकांची भूमिका नैराश्यपूर्ण असल्याचे दिसते. विशेषतः काँग्रेस पक्षाकडून देशाच्या प्रत्येक आर्थिक यशाकडे संशयाच्या नजरेने पाहिले जाते. प्रश्न उपस्थित करणे हा विरोधकांचा लोकशाहीतील अधिकार आहे. परंतु देशाच्या प्रगतीचा स्वीकार करण्याचा आणि त्याचे श्रेय भारतीय जनतेला देण्याचा उमदेपणा व राजकीय प्रामाणिकपणा विरोधकांकडे असायला हवा होता. विरोधासाठी विरोध करणे आणि देशाच्या यशालाही अपयशाच्या चष्म्यातून पाहणे आजच्या वैशिष्ट्यपूर्ण जागतिक परिस्थितीत निश्चितच अधिक खटकते. देशातील जनतेला मात्र राजकीय आरोप-प्रत्यारोपांपेक्षा देशाने कठीण परिस्थितीतही पुढे जाण्याची क्षमता सिद्ध केली याचा अभिमान आहे. अर्थव्यवस्था मजबूत राहणे म्हणजे रोजगार, व्यवसाय, गुंतवणूक आणि सामान्य नागरिकांच्या भविष्यासाठी आशावाद निर्माण होणे. म्हणूनच आर्थिक प्रगतीकडे पक्षीय राजकारणापलीकडे जाऊन पाहण्याची गरज आहे. आजचा भारत आत्मविश्वासपूर्ण वाटचाल करतो आहे. संकटे, आव्हाने कायम आहेत. पण त्यांना खंबीरपणे सामोरे जाण्याची मानसिकता भारताने कमावली आहे. जागतिक अस्थिरतेतही भारताने आपली विकासाच्या वाटेवरची वाटचाल कायम ठेवली आहे. या कामगिरीवर राजकीय नकारात्मकतेचे सावट आणण्याऐवजी ती टिकवून ठेवण्यासाठी सरकार आणि समाजाने एकत्र पुढे जाणे आवश्यक आहे.**

# नैतिक मूल्यांचा प्रकाश मनामनात पसरू दे!

पुणे जिल्ह्यातील जुन्नर तालुक्यातील पिंपळवंडी येथे नऊ वर्षांच्या चिमुकलीवर अत्याचार करून तिची हत्या झाल्याची धक्कादायक घटना नुकतीच समोर आली आणि संपूर्ण समाजमन सुन्न झाले. एका निरागस बालिकेवर असा अमानुष अत्याचार होणे ही केवळ गुन्हेगारी घटना म्हणून पाहून पुढे जाण्यासारखी बाब नाही. ती आपल्या समाजासमोर एक अस्वस्थ करणारा प्रश्न उभी करते. माणसाच्या मनातील माणुसकी, करुणा, संयम, विवेक, स्त्रीविषयीचा आदर आणि नैतिकतेची जाणीव कुठे हरवत चालली आहे?

याच वर्षी पुणे जिल्ह्यातील भोर तालुक्यातील नसरापूर येथे साडेतीन वर्षांच्या चिमुकलीवर अत्याचार करून तिची हत्या करण्यात आली. या प्रकरणात आरोपीला दोषी ठरवून २९ जून २०२६ रोजी विशेष न्यायालयाने मृत्युदंडाची शिक्षा सुनावली. नसरापूरच्या घटनेने महाराष्ट्राला हादरवून सोडले होते. त्यानंतर पिंपळवंडीतील घटना समोर येणे अधिक वेदनादायक आहे.

अशा घटना घडल्यानंतर आपण संताप व्यक्त करतो, निषेध करतो आणि कठोर शिक्षेची मागणी करतो. हे आवश्यक आहेच. कायदा कठोर असला पाहिजे आणि गुन्हेगाराला शिक्षा झालीच पाहिजे, परंतु त्याहीपलीकडे जाऊन आपण स्वतःला एक प्रश्न विचारला पाहिजे की अशा विकृती निर्माणच होऊ नयेत यासाठी समाज म्हणून आपण काय करीत आहोत? कायदा गुन्हा घडल्यानंतर शिक्षा करू शकतो, पण संस्कार, नैतिकता, विवेक, संयम आणि संवेदनशीलता गुन्हा घडण्यापूर्वी माणसाला थांबवू शकतात. म्हणून अशा घटनांकडे केवळ कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न म्हणून पाहणे पुरेसे नाही. हा प्रश्न कुटुंबाचा आहे, शिक्षणाचा आहे, समाजाचा आहे आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे माणसाच्या नैतिक जडणघडणीचा आहे.

आज आपण वारंवार म्हणतो, "पूर्वीसारखे संस्कार राहिले नाहीत", "नैतिक मूल्ये कमी झाली आहेत", "आजच्या पिढीला माणुसकी उरलेली नाही." या विधानांमध्ये काही अंशी वास्तव असले तरी नैतिक मूल्ये पूर्णपणे संपली आहेत, असे म्हणणे योग्य ठरणार नाही. आजही प्रामाणिकपणे जगणारी, दुसऱ्याच्या दुःखात धावून जाणारी, संकटात मदत करणारी, अन्यायाविरुद्ध उभी राहणारी आणि स्वतःच्या स्वार्थापेक्षा समाजहिताला महत्त्व देणारी असंख्य माणसे आपल्या आजूबाजूला आहेत. प्रश्न असा आहे की, चांगुलपणाची ही उदाहरणे आपण किती पाहतो, वाचतो आणि पुढच्या पिढीपर्यंत पोहोचवतो?

'संस्कार' म्हणजे केवळ उपदेश, धार्मिक विधी किंवा परंपरा नव्हेत. व्यक्तीच्या विचारांना, भावनांना आणि आचरणाला योग्य दिशा देणारी प्रक्रिया म्हणजे संस्कार. सत्य, प्रामाणिकपणा, करुणा, समता, संयम, कर्तव्यनिष्ठा, सहकार्य, विवेक, सामाजिक जबाबदारी आणि मानवता ही मूल्ये मनात रुजणे आणि ती प्रत्यक्ष जीवनात उतरवणे म्हणजे खऱ्या अर्थाने संस्कार. नैतिक मूल्ये म्हणजे योग्य आणि अयोग्य यातील फरक समजून योग्य आचरण करण्यास प्रवृत्त करणारी जीवनमूल्ये. सत्यनिष्ठा, प्रामाणिकपणा, सचोटी, न्याय, समता, बंधुता, करुणा, सहिष्णुता, कर्तव्यनिष्ठा, संयम, परोपकार, स्वावलंबन, विवेक आणि मानवता ही त्यांची विविध रूपे आहेत.

आज काही ठिकाणी खोटेपणा, स्वार्थ, भ्रष्टाचार, फसवणूक, असहिष्णुता, हिंसा, द्वेष, दिखाऊपणा आणि सोशल मीडियावरील अपप्रचार वाढताना दिसतो. पण त्याचवेळी प्रामाणिकपणा, सेवाभाव, त्याग आणि माणुसकीची उदाहरणेही कमी नाहीत. म्हणूनच प्रश्न "नैतिक मूल्ये संपली आहेत का?" असा नसून "नैतिक मूल्यांना आपल्या जीवनात पुन्हा मध्यवर्ती स्थान कसे मिळवून द्यायचे?" असा असला पाहिजे.

संस्कारांची पहिली आणि सर्वांत प्रभावी शाळा म्हणजे कुटुंब. मुलांना आपण काय सांगतो यापेक्षा आपण स्वतः काय करतो, याचा त्यांच्या मनावर अधिक परिणाम होतो. मुलाला "खोटे बोलू नकोस" असे सांगताना पालक स्वतः खोटे बोलत असतील तर मुलाला शब्दांपेक्षा कृतीचा धडा मिळतो. "नियम पाळ" असे सांगणारे पालक स्वतः नियम मोडत असतील तर मुलाला नियमांपेक्षा सोयीचे महत्त्व समजते. संस्कार कानावर पडणाऱ्या शब्दांतून कमी आणि डोळ्यांसमोर दिसणाऱ्या आचरणातून अधिक घडतात.

शाळा आणि शिक्षकांची भूमिकाही तेवढीच महत्त्वाची आहे. शिक्षण म्हणजे केवळ परीक्षा, गुण, पदवी आणि नोकरी मिळवण्याचे साधन नव्हे. शिक्षणाने विवेकशील, संवेदनशील, प्रामाणिक आणि जबाबदार नागरिक घडले पाहिजेत. चरित्रवाचन, कथावाचन, पुस्तक चर्चा, समाजोपयोगी उपक्रम, पर्यावरणसंवर्धन, श्रमसंस्कार, वृद्धसेवा आणि वाचनसंवाद यांना शिक्षणात अधिक महत्त्व मिळाले पाहिजे. मुलांना प्रामाणिक राहण्याचा उपदेश करण्यापेक्षा शिक्षकाने स्वतः प्रामाणिक राहणे, दुसऱ्याचा आदर करण्यास सांगण्यापेक्षा घरातील मोठ्यांनी एकमेकांचा आदर करणे आणि मानवतेचे धडे देण्यापेक्षा संकटात प्रत्यक्ष मदतीला धावून जाणे हा अधिक प्रभावी संस्कार आहे.

नैतिकतेचे उदाहरण देताना केवळ मोठ्या व्यक्तींचीच गरज नसते. तुकाराम ओंबळे हे त्याचे अत्यंत प्रभावी उदाहरण आहेत. २६ नोव्हेंबर २००८ रोजी मुंबईवरील दहशतवादी हल्ल्याच्या वेळी सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक तुकाराम ओंबळे यांनी स्वतःच्या जीवाची पर्वा न करता अजमल कसाबला पकडण्यासाठी त्याच्यावर झेप घेतली. ते शहीद झाले, पण कसाबला जिवंत पकडणे शक्य झाले. ही केवळ शौर्यकथा नाही; ती कर्तव्यनिष्ठा, धैर्य, आत्मत्याग आणि देशसेवेची नैतिक शिकवण आहे, परंतु नैतिक मूल्ये जगण्यासाठी प्रत्येक वेळी तुकाराम ओंबळे यांच्यासारखा असामान्य प्रसंग यायलाच हवा असे नाही. एखादा विद्यार्थी संधी असूनही परीक्षेत कॉपी करत नाही, तो प्रामाणिकपणा जपतो. एखाद्या व्यक्तीला सापडलेले पाकीट स्वतःकडे न ठेवता मालकाला परत करणे हा सचोटीचा संस्कार आहे. एखादा नागरिक संकटात सापडलेल्या अनोळखी व्यक्तीच्या मदतीला धावून जातो, ते मानवतेचे उदाहरण आहे. एखादा युवक अनोळखी रुग्णासाठी रक्तदान करतो, ते परोपकाराचे उदाहरण आहे. सोशल मीडियावर आलेली खोटी माहिती तपासल्याशिवाय पुढे न पाठवणे हा आजच्या काळातील विवेकाचा संस्कार आहे.

आजही आपत्ती, पूर, अतिवृष्टी, अपघात अशा संकटांच्या काळात स्वतःचा वेळ, पैसा, अन्न आणि श्रम देऊन मदत करणारे असंख्य नागरिक आहेत. अनोळखी व्यक्तीसाठी रक्तदान करणारे युवक आहेत. दुःखाच्या प्रसंगीही अवयवदानाचा निर्णय घेऊन इतरांना नवजीवन देणारी कुटुंबे आहेत. पर्यावरणासाठी काम करणारे युवक आहेत. सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता राखणारे नागरिक आहेत. ही सर्व नैतिक मूल्यांची वर्तमानकाळातील जिवंत उदाहरणे आहेत.

यामुळेच आजच्या समाजाकडे केवळ नकारात्मक नजरेने पाहणे योग्य नाही. नैतिक माणसे उरली नाहीत असे नाही; त्यांच्या चांगुलपणाच्या कथा आपण पुरेशा प्रमाणात सांगत नाही. अनैतिकता अनेकदा मोठ्या आवाजात दिसते; नैतिकता मात्र शांतपणे आपले काम करत असते.

विवेकाचा अंतःदीप जागा असेल तर माणूस अंधारातही योग्य मार्ग निवडू शकतो. हा अंतःदीप प्रज्वलित करण्याचे प्रभावी साधन म्हणजे वाचन. बुद्धांचे विचार वाचताना करुणा समजते. महावीरांचे जीवन वाचताना अहिंसेची खोली समजते. येशूंच्या जीवनातून क्षमा समजते. गुरु नानकांच्या विचारांतून समता आणि सेवा समजते. फुले-सावित्रीबाईंचे जीवन वाचताना संघर्षातून परिवर्तनाची प्रेरणा मिळते. आंबेडकरांचे लेखन वाचताना न्याय आणि स्वाभिमान समजतो. गांधींचे जीवन वाचताना सत्याचे सामर्थ्य समजते. मंडेलांचे जीवन वाचताना क्षमेची ताकद जाणवते. नाइटिंगेलकडून सेवा शिकता येते. मलालाकडून धैर्य शिकता येते. तुकाराम ओंबळे यांच्याकडून कर्तव्यनिष्ठा शिकता येते. म्हणून चरित्रवाचन म्हणजे केवळ एखाद्या व्यक्तीची माहिती मिळवणे नव्हे; ते मूल्यांचे जिवंत शिक्षण आहे.

आज आपण मुलांना यशस्वी व्हायला शिकवतो; पण यश कोणत्या मार्गाने मिळवायचे, हे किती शिकवतो? आपण त्यांना स्पर्धा शिकवतो; पण सहकार्य शिकवतो का? अधिकार सांगतो; पण कर्तव्य सांगतो का? स्वातंत्र्य देतो; पण जबाबदारी शिकवतो का? मोठे होण्याचे स्वप्न दाखवतो; पण मोठा माणूस होण्याचा अर्थ सांगतो का? हीच आजच्या संस्कारांची खरी कसोटी आहे.

काळ बदलला आहे, म्हणून संस्कारांचा आशयही व्यापक झाला पाहिजे. आज मुलांना फक्त "खोटे बोलू नका" एवढे सांगणे पुरेसे नाही; डिजिटल खोटेपणापासून सावध राहा, हेही शिकवावे लागेल. दुसऱ्याचे लेखन किंवा चित्र स्वतःच्या नावाने वापरू नका, हा डिजिटल सचोटीचा संस्कार आहे. मतभिन्नता असली तरी दुसऱ्याचा सन्मान करा, हा लोकशाही संस्कार आहे. पर्यावरण, पाणी, ऊर्जा आणि सार्वजनिक साधनसंपत्तीबद्दल जबाबदार राहा, हा आधुनिक सामाजिक संस्कार आहे.

**-प्रा.डॉ. सुभाष वाघमारे,** संचालक, साहित्यवेल वाचन प्रसार चळवळ, सातारा



## बदलते तंत्रज्ञान

# रेल्वे प्रवासासाठी असे मिळाले उपयुक्त ॲप

कधी कधी दैनंदिन आयुष्यातील अगदी लहानशी अडचण एका मोठ्या व्यवसायाच्या कल्पनेला जन्म देईल, हे सांगता येत नाही. प्रवाशांच्या सोयीसाठी बनवलेले लोकप्रिय 'Where is My Train' या ॲपची कहाणीही अशीच काहीशी आहे. ट्रेन उशिरा आल्यामुळे आणि तिची नेमकी माहिती न मिळाल्यामुळे प्रवाशांना होणाऱ्या त्रासातून या ॲपची निर्मिती झाली, जे आज लाखो प्रवाशांसाठी वरदान ठरले आहे.



ट्रेन नेमकी कुठे पोहोचली आहे, ती किती उशिराने येणार आहे, याची माहिती प्रवाशांना वेळेवर मिळत नव्हती. प्रवाशांची ही समस्या अहमद निजाम आणि त्यांच्या टीमने हेरली आणि समस्या सोडवण्यासाठी 'Where is My Train' ॲप तयार केले. हे ॲप २०१५ मध्ये लॉन्च करण्यात आले. प्रवाशांना ट्रेनचे लोकेशन आणि इतर आवश्यक माहिती एकाच ठिकाणी मिळावी, हा या ॲपमागचा मुख्य उद्देश होता.

या ॲपचे सर्वात खास वैशिष्ट्य म्हणजे त्याचे ऑफलाइन ट्रेन ट्रॅकिंग फीचर. अनेक परिस्थितींमध्ये इंटरनेट किंवा जीपीएस उपलब्ध नसतानाही प्रवाशांना ट्रेनचे लोकेशन समजत होते. यासाठी ॲपने मोबाइल टॉवरकडून मिळणाऱ्या माहितीचा वापर केला. भारतातील अनेक भागांमध्ये इंटरनेट कनेक्टिव्हिटी अद्यापही कमकुवत आहे. त्यामुळे इंटरनेटशिवाय ट्रेनचे लोकेशन जाणून घेण्याची सुविधा प्रवाशांसाठी अत्यंत उपयुक्त ठरली.

'Where is My Train' ॲपमध्ये केवळ ट्रेनचे लोकेशन दाखवले जात नव्हते. प्रवाशांसाठी अनेक महत्त्वाच्या सुविधा या ॲपमध्ये देण्यात आल्या होत्या. यामध्ये लाईव्ह ट्रेन स्टेटस, ट्रेनचे वेळापत्रक, पीएनआर स्टेटस, प्लॅटफॉर्मची माहिती आणि कोचची स्थिती...यांसारख्या सुविधांचा समावेश होता. या सुविधांमुळे हळूहळू ॲपची लोकप्रियता वाढली आणि मोठ्या संख्येने रेल्वे प्रवासी त्याचा वापर करू लागले.

ॲपची वाढती लोकप्रियता गुगलच्या लक्षात आली. त्यानंतर २०१८मध्ये गुगलने 'Where is My Train' तयार करणारी कंपनी Sigmoid Labs खरेदी केली. या व्यवहाराची अधिकृत किंमत गुगलने जाहीर केली नव्हती, मात्र विविध मीडिया रिपोर्ट्समध्ये हा व्यवहार सुमारे ₹२८० कोटींचा होता.

ट्रेनच्या विलंबामुळे प्रवाशांना होणारी एक सामान्य अडचण सोडवण्याच्या कल्पनेतून हा प्रवास सुरू झाला. पुढे या कल्पनेने लाखो रेल्वे प्रवाशांच्या दैनंदिन प्रवासात मदत केली आणि अखेर गुगलने संबंधित कंपनीची खरेदी केली.

# लोकनाट्य कलाकार शाहीर साबळे

शाहीर साबळे हे ख्यातकीर्त मराठी शाहीर व लोकनाट्य कलाकार. त्यांचे पूर्ण नाव कृष्णराव गणपतराव साबळे, परंतु शाहीर साबळे या नावानेच ते परिचित राहिले. त्यांचा जन्म ३ सप्टेंबर १९२३ रोजी सातारा जिल्ह्यातील पसरणी (ता. वाई) येथे एका शेतकरी कुटुंबात झाला. त्यांचे वडील माळकरी होते. वारकरी पंथाचे भजन-कीर्तन ते करीत असत. आई निरक्षर, पण जात्यावर दळताना ओव्या रचणारी व गाणारी होती. त्यामुळे गायकीचा वारसा शाहिरांना आई-वडिलांकडून मिळाला. गावच्या भजनी मंडळात ते गात असत. बालवयात त्यांना बासरीवादनाचाही छंद जडला. सुरुवातीचे शिक्षण जन्मगावी घेऊन पुढे ते त्यांच्या मामांकडे अमळनेरला गेले. तेथे सातवीपर्यंतचे शिक्षण झाल्यानंतर त्यांनी शाळा सोडली, मात्र अमळनेरला त्यांना साने गुरुजींचा सहवास लाभला.

गुरुजींकडून प्रखर राष्ट्रवाद आणि निर्व्याज देशभक्तीचे बाळकडू त्यांनी आत्मसात केले. देशाच्या स्वातंत्र्य चळवळीत जनजागृती करण्यासाठी गुरुजींबरोबर ते दौरे करू लागले तसेच राजकीय-सामाजिक अपप्रवृत्तींवर प्रहार करण्यासाठी शाहिरी माध्यमाचा उपयोग करून घेण्याचा निर्णय त्यांनी घेतला. पुढे जागृती शाहीर मंडळ त्यांनी काढले. धुळ्याचे शाहीर सिद्राम बसाप्पा मुचाटे यांचा आदर्श त्यांनी स्वतःसमोर ठेवला होता. पुढे १९४२ साली



## निमित्त

शाहीर शंकरराव निकम यांच्या प्रभावाखाली ते आले. निकमांकडूनच त्यांनी शाहिरी कलेचे प्रत्यक्ष धडे घेतले. हैदराबाद मुक्तिसंग्रामातही त्यांनी प्रचाराचे रान उठवले. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर त्यांनी 'जातीयवाद की समाजवाद' (१९४७) हा पहिला पोवाडा लिहिला. स्वतंत्र भारतात नव्याने सुरू झालेल्या राजकारणाचा संदर्भ या पोवाड्याला होता. त्यांचा विशेष उल्लेखनीय पोवाडा म्हणजे आधुनिक मानवाची कहाणी.

स्वातंत्र्योत्तर काळात पंढरपूरच्या विठ्ठल मंदिरात अस्पृश्यांना प्रवेश द्यावा, म्हणून साने गुरुजींनी प्राणांतिक उपोषण आरंभिले होते. त्यावेळी शाहिरांनी आपल्या पथकासह या मंदिर प्रवेशासाठी महाराष्ट्रभर प्रचार करून अनुकूल वातावरण निर्माण केले. संयुक्त महाराष्ट्राची चळवळ, गोवामुक्ती आंदोलन यांतही जनजागृतीसाठी त्यांनी प्रभावी शाहिराची भूमिका बजावली. महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर कवी राजा बढे यांनी रचलेले आणि श्रीनिवास खळे यांनी संगीतबद्ध केलेले गर्जा महाराष्ट्र माझा हे गीत शाहिरांनी गायिले.

आंधळं दळतंय पूर्वी त्यांनी अनेक प्रहसने रंगभूमीवर आणली होती. त्याचप्रमाणे यमराज्यात एक रात्र या मुक्तनाट्याचा बंदिस्त नाट्यगृहात प्रयोग करून (१६ जानेवारी १९६०) व्यावसायिक रंगभूमीवर त्यांनी पहिले पाऊल टाकले. त्यानंतर माकडाला चढली भांग (१९६९, चिं. त्र्यं. खानोलकर), शेतात मोती, हातात माती (१९६९), फुटपायरीचा सम्राट (१९७०, विजय तेंडुलकर ), एक तमाशा सुंदरसा (१९७१, सई परांजपे), कोंडू हवालदार (१९७६, पां. तु. पाटणकर) यांसारखी मुक्तनाट्ये सादर केली. त्यांची एकूण १४ मुक्तनाट्ये असून त्यांतील नऊ त्यांनी, तर पाच इतर लेखकांनी लिहिली आहेत. शाहिरांनी त्यांच्या सर्व मुक्तनाट्यांतून समाजप्रबोधनाला योग्य असे विषय प्रभावीपणे सादर केले. अशा या महान शाहिराचे २० मार्च २०१५ रोजी निधन झाले.

शाहीर साबळे यांना अनेक पुरस्कार, मान-सन्मान प्राप्त झाले, तर त्यांच्या नावाने मुंबई भाजपच्या वतीने शाहीर साबळे स्मृती गौरव पुरस्कार देण्यात येतो. पहिल्या वर्षी हा पुरस्कार पार्श्वगायक रवींद्र साठे यांना मिळाला होता. (साभार इंटरनेट)

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# तुळशीचे पान म्हणजे आरोग्यासाठी वरदानच!

तुळस ही पवित्र मानली जाणारी वनस्पती आहे. ती फक्त धार्मिक दृष्टिकोनातून महत्त्वाची नाही, तर त्याचे अनेक औषधी फायदेही आहेत. तुळशीच्या पानांत जंतूनाशक, विषाणूनाशक, दाहशामक, अँण्टी ऑक्सिडंट्स आणि रोगप्रतिकारशक्ती वाढवणारे गुण असतात. त्यामुळे तुळस खाणे आणि तुळस त्वचेवर लावणे दोन्ही कृती फायद्याच्या ठरतात.



तुळशीच्या पानांचा लेप त्वचेवरील विकारांवर खास परिणामकारक मानला जातो. त्वचेवर वारंवार येणारे फोड, पुरळ, खाज किंवा किड्यांमुळे होणारी ॲलर्जी यावर तुळशीची पाने लावणे एकदम प्रभावी ठरते. ही पाने वाटून लावल्यास सूज कमी होते आणि त्वचेला थंडावा मिळतो. जखमा लवकर भरव्या आणि त्यावर संसर्ग होऊ नये यासाठीही तुळशीचा लेप उपयुक्त आहे. उन्हामुळे त्वचा लालसर झाली असेल किंवा ॲलर्जीमुळे त्रास होत असेल तर तुळशीच्या पानांचा लेप लावल्याने आराम मिळतो.

तुळशीच्या पानांचा काढा हा घरगुती औषधांमध्ये सर्वात प्रभावी मानला जातो. सर्दी, खोकला, ताप, घशाची खवखव यांसाठी तुळशीचा काढा घेतल्यास लवकर बरे वाटते. श्वसनमार्गातील अडथळे दूर करण्याची क्षमता तुळशीमध्ये असल्याने दमा किंवा श्वसनासंबंधी समस्या असणाऱ्यांसाठी हा काढा उपयुक्त ठरतो. पचनशक्ती कमी असलेल्यांनी तुळशीचा काढा घेतल्यास भूक सुधारते आणि पचनाचे त्रास कमी होतात. शरीराला उब मिळावी यासाठी तुळशी, आलं, काळी मिरी असा काढा घेतला जातो.

तुळशीचे आणखी काही महत्त्वाचे फायदे म्हणजे ती रोगप्रतिकारशक्ती मजबूत करते. सतत बदलत्या हवामानात किंवा वारंवार आजारी पडणाऱ्यांनी तुळशीचा नियमित वापर केला तर शरीराला आजारांशी लढण्याची ताकद मिळते. तुळशीतील अँण्टी ऑक्सिडंट्स शरीरातील हानिकारक मुक्त रॅडिकल्सचा नाश करतात आणि पेशींचे रक्षण करतात.

याशिवाय तुळशी रक्तदाब नियंत्रित ठेवण्यास मदत करते, कोलेस्टेरॉल कमी करण्यास उपयोगी ठरते आणि हृदयाचे आरोग्य चांगले राखते. पोटदुखी, डोकेदुखी किंवा मासिक पाळीतील वेदना कमी करण्यासाठीही तुळशीचा उपयोग केला जातो. तिच्या सुगंधामुळे वातावरण शुद्ध होते आणि मनाला प्रसन्नता मिळते.

# सुधागडच्या विकासकामांचा आढावा

## आजपासूनच कामाला लागा! सभापती वैकुंठ पाटील यांचे अधिकाऱ्यांना निर्देश

**पाली : प्रतिनिधी**

जिल्हा परिषदेच्या माध्यमातून सर्वसामान्य नागरिक, शेतकरी आणि कष्टकरी जनतेपर्यंत शासनाच्या विविध योजना प्रभावीपणे पोहोचल्या पाहिजेत. केवळ आढावा बैठक घेऊन प्रश्न सुटणार नाहीत, बैठक संपली म्हणजे काम संपले असे समजू नका. आजपासूनच तुमचे काम सुरू झाले आहे, अशा शब्दांत रायगड जिल्हा परिषदेच्या कृषी, पशुसंवर्धन व दुग्धविकास समितीचे सभापती वैकुंठ पाटील यांनी अधिकाऱ्यांना तंबी दिली.



सुधागड तालुक्यातील विविध विकास योजनांचा विभागनिहाय आढावा घेताना त्यांनी आरोग्य, ग्रामीण पाणीपुरवठा, अंगणवाड्या, रस्ते, कृषी आणि पशुसंवर्धन विभागाच्या प्रश्नांवर अधिकाऱ्यांना धारेवर धरत तातडीने कार्यवाहीचे आदेश दिले. उन्हेरे कुंड येथे असलेल्या राज रिसॉर्टमध्ये ही आढावा बैठक झाली. सभापती वैकुंठ पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीला सभापती जागृती मानकर, मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी रुपाली सातपुते, उपमुख्य कार्यकारी अधिकारी ग्रामपंचायत विशाल तनपुरे, उपसभापती संदेश शेवाळे, जिल्हा परिषद सदस्य चंद्रकांत वारगुडा, सदस्या शर्मिला बोडके, पंचायत समिती सदस्या प्रणिता परदेशी, भाजपच्या ज्येष्ठ नेत्या गीता पालरेचा, भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष आलाप मेहता, नगराध्यक्ष पराग मेहता, नगरसेवक आरिफ मणियार, जिल्हा किसान मोर्चाचे अध्यक्ष सुशील बारस्कर, शिवसेनेचे जिल्हा संघटन पदाधिकारी राजेंद्र राऊत, शिवसेना शहरप्रमुख ओमकार खोडागळे, दादा कारखानीस, ग. रा. म्हात्रे, सुनील राऊत, प्रणिता शेठ, उपसरपंच शरद बोडके, राजेंद्र राऊत व विविध विभागांचे अधिकारी, ग्रामसेवक व अंगणवाडी सेविका आणि नागरिक उपस्थित होते.

यावेळी बोलताना सभापती वैकुंठ पाटील म्हणाले की, सुधागड तालुका मुंबई-पुण्याच्या जवळ असूनही इको सेन्सिटिव्ह झोनमुळे येथे अनेक उद्योगांवर मर्यादा आहेत. त्यामुळे शेतीला पूरक उद्योगांना चालना देण्याची गरज असून कृषी व पशुसंवर्धन विभागाच्या माध्यमातून सुधागड तालुक्याला न्याय देण्याची भूमिका राहील. केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजना कोकणातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्यासाठी अधिकारी व लोकप्रतिनिधींनी अधिक ताकदीने काम करण्याचे आवाहन त्यांनी केले.

ग्रामीण पाणीपुरवठा विभागाच्या आढाव्यात तालुक्यातील ३३ ग्रामपंचायतींच्या पाणीपुरवठ्याची स्थिती तपासण्यात आली. अतिवृष्टीमुळे २८ पाणीपुरवठा योजना नुकसानग्रस्त होऊन बंद असल्याची माहिती बैठकीत समोर आली. पावसामुळे बंद झालेल्या योजना तातडीने दुरुस्त करून सुरू करण्याचे आदेश सभापती पाटील यांनी दिले. सुधागड तालुक्यातील फार्म हाऊसच्या ठिकाणी झालेल्या अतिक्रमणामुळे गावांकडे जाणारे रस्ते अरुंद होत असून ग्रामस्थांना त्रास सहन करावा लागत असल्याचा मुद्दा बैठकीत मांडण्यात आला. रस्त्यांची महसुली अभिलेखात योग्य नोंद, मोजणी व हद्द निश्चिती करून अतिक्रमण रोखण्याची गरज पाटील यांनी व्यक्त केली.

ग्रामपंचायतींनी गावातील रस्त्यांचे प्रस्ताव तयार करून संबंधित समितीकडे पाठवावेत, तसेच ज्या रस्त्यांवर अतिक्रमण झाले आहे ते हटविण्यासाठी आवश्यक कार्यवाही करावी, असे निर्देश त्यांनी दिले. ग्रामविकास अधिकाऱ्यांनी केवळ कार्यालयात बसून कागदोपत्री काम न करता गावात प्रत्यक्ष पाहणी करून पाणीपुरवठा, आरोग्य, रस्ते व अन्य मूलभूत सुविधांची स्थिती तपासावी, असेही त्यांनी स्पष्ट केले. सुधागड तालुक्यातील १७० अंगणवाड्यांपैकी १४० अंगणवाड्यांना स्वतःच्या इमारती आहेत, मात्र १७ अंगणवाड्या खासगी घरात, ११ समाजमंदिरात आणि दोन अंगणवाड्या प्राथमिक शाळेत भरत असल्याची माहिती बैठकीत देण्यात आली. यावर पाटील यांनी नाराजी व्यक्त केली.

जिल्हा नियोजन मंडळाकडून दरवर्षी अंगणवाड्यांसाठी निधी उपलब्ध होत असताना भाड्याच्या जागेत अंगणवाड्या सुरू राहणे योग्य नसल्याचे त्यांनी सांगितले. त्यासाठी आवश्यक जागा निश्चित करणे, प्रस्ताव तयार करणे व प्रशासकीय कार्यवाही पूर्ण करण्याची जबाबदारी ग्रामसेवकांनी पार पाडावी, असे आदेश देत तातडीने अहवाल सादर करण्यास सांगितले. या अहवालाच्या आधारे भाड्याच्या जागेतील अंगणवाड्या शासकीय जागेत, गावठाणात बांधण्यासाठी निधी उपलब्ध करून दिला जाईल, अशी ग्वाही त्यांनी दिली. रायगड जिल्हा परिषद व पशुसंवर्धन विभागाच्या माध्यमातून सभापती वैकुंठ पाटील यांच्या संकल्पनेतून जिल्ह्यात प्रथमच दोन अभिनव योजना राबविण्यात येत आहेत. महिला सक्षमीकरणाच्या उद्देशाने कुक्कुटपालन योजनेअंतर्गत सुमारे २० हजार महिलांना लाभ देण्याचे नियोजन आहे. सर्वसाधारण प्रवर्गासाठी ७५ टक्के, तर अनुसूचित जाती-जमाती व विशेष मागास प्रवर्गासाठी ९५ टक्के अनुदान देण्यात येणार आहे.

यावेळी पोंगडे महाराज यांनी सुधागड तालुक्यात दूध संघ स्थापन करण्याची मागणी केली. या मागणीला सभापती वैकुंठ पाटील यांनी पूर्ण पाठिंबा दर्शविला. येत्या काळात सुधागडमध्ये दूध संघ निर्माण करण्यासाठी प्रयत्न केले जातील, अशी ग्वाही त्यांनी दिली. शिवसेनेचे जिल्हा संघटन पदाधिकारी राजेंद्र राऊत यांनी सभापती वैकुंठ पाटील यांच्या कामाच्या धडाडीचे कौतुक केले. रायगड जिल्ह्यात पशुरक्त तपासणी प्रयोगशाळा उपलब्ध नसल्याने जिल्ह्याच्या मध्यवर्ती ठिकाणी, पेण येथे प्रयोगशाळा सुरू करावी, तसेच कृत्रिम रेतनासाठी पारंपरिक एआय गनऐवजी कॅमेऱ्याच्या माध्यमातून पशूंच्या प्रजनन मार्गाची अंतर्गत स्थिती पाहता येणारी आधुनिक उपकरणे उपलब्ध करून द्यावीत, अशी मागणी त्यांनी केली.

आजच वैद्यकीय अधिकाऱ्यांनी कामाला सुरुवात करून व्हॉट्सअॅप ग्रुप तयार करावा. ग्रुपमध्ये पंचायत समिती सदस्य, जिप सदस्य व सभापतींना समाविष्ट करून कामाचा तपशील जिओटॅगसह पाठवावा, अन्यथा अधिकाऱ्यांची तक्रार राज्यमंत्र्यांकडे पाठविण्याचा इशारा पाटील यांनी दिला. पाटील यांनी स्पष्ट संदेश दिला की, आता तुम्हाला विचारायला सक्षम लोकप्रतिनिधी उपस्थित आहेत. बैठक उरकली म्हणजे विषय संपला असे समजू नका. प्रत्येक विषयाचा पाठपुरावा केला जाणार आहे.

## तळ्यात खंडित वीजपुरवठ्यावरून भाजप आक्रमक; विद्युत मंडळाच्या अधिकाऱ्यांशी चर्चा

**तळा : प्रतिनिधी**



तळा शहर व तालुक्यात वीज नियमित खंडित होत असल्याने नागरिक, व्यापारी, शेतकरी वर्गाला त्रास सहन करावा लागत असून नागरिकांमधून संताप व्यक्त केला जात आहे. या पार्श्वभूमीवर तळा तालुका भाजपने उपकार्यकारी अभियंता सचिन बलेकर, सहाय्यक अभियंता आसबे यांना निवेदन सादर करून चर्चा केली.

यावेळी भाजप तालुकाध्यक्ष निलेश रातवडकर, माजी अध्यक्ष कैलास पायगुडे, महिला अध्यक्षा लोंढे, युवक अध्यक्ष वैभव कदम, शहर अध्यक्ष राकेश कासार, युवक शहर अध्यक्ष सुयोग बारटक्के, महादेव आर्डे, किशोर वेदक, घाटवळ, मोरेश्वर गोरिवले, सुरेश शिंदे आदींसह कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी विद्युत मंडळाचे अधिकारी उपकार्यकारी अभियंता व सहाय्यक अभियंता यांच्याशी बैठक घेण्यात आली. चांगली सेवा देण्याचा प्रयत्न राहील, असे त्यांनी सूचित केले.


### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या नोटीसीद्वारे कळविणेत येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली मिळकत खाली नमूद केलेल्या इसमांकडून कायम खरेदी घेण्याचे ठरविले आहे.

तरी सदरहू मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेन्ट, साठेकरार, फरोक्त, खरेदीखत, गहाण, दान, बक्षिस, चार्ज, अटॅचमेंट, लीज वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाले पासून **७ दिवसाच्या आत** आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषेद करुन कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क हितसंबंध नाही असे समजून आमचे आशिल सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल यांची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

मिळकतीचे वर्णन
मौजे चिंचवली तर्फे वाजे, ता. पनवेल, जि. रायगड,

| सर्व्हे नंबर /गट नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रू.पै. | मालकाचे नाव |
|---|---|---|---|---|
| ५७ | ३ | ० - ५० - ९०<br>पो. ख. ० - १३ - २०<br>एकूण क्षेत्र ० - ६४ - १० | १०.५७ | गणपत बामा पाटील |
| वरील **एकूण क्षेत्र ० - ६४ -१० हे.आर.चौ.मी.** पैकी **विक्री क्षेत्र ० - २२ - ०० हे.आर.चौ.मी., आकार १०.५७ रू. पैसे** या मिळकतीची.... | | | | |

पनवेल.
दिनांक : ०२/०९/२०२६

सही/-
**ॲड. जयवंत एकनाथ भोपी**
**ॲडव्होकेट**
शॉप नं. १३, वरद विनायक कॉम्प्लेक्स,
प्लॉट नंबर ३, सेक्टर नंबर ५, गुरूद्वारा समोर,
नवीन पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड.
मो. नं. ९०२२३१७७७२.


## कमळ पतसंस्थेच्या नव्या इमारतीचा आराखडा मंजूर

**अलिबाग : प्रतिनिधी**

कमळ नागरी सहकारी पतसंस्थेने नव्याने खरेदी केलेली जागा व त्यावर बांधावयाच्या इमारतीचा संभाव्य आराखडा संस्थेच्या ३४व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत मंजूर करण्यात आला. शनिवारी (दि. २९) कमळ पतसंस्थेची ३४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा क्षात्रैक्य समाज हॉल, कुरूळ येथे घेण्यात आली. सभेच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष नंदकुमार चाळके होते.




सभेत कमळ नागरी सहकारी पतसंस्थेने नव्याने खरेदी केलेली जागा व त्यावर बांधावयाची इमारत यांचा संभाव्य आराखडा संस्थेचे संस्थापक अध्यक्ष गिरीश तुळपुळे यांनी विस्तृतपणे सभेपुढे सादर केला. यामध्ये संभाव्य आराखडा, खर्च यांचा लेखाजोखा सादर करीत सभासदांच्या शंकांचे समाधान केले. त्यानंतर हा ठराव मंजूर करण्यात आला.संस्थेचे अध्यक्ष नंदकुमार चाळके यांनी आपल्या मनोगतात संस्थेच्या गतवर्षीच्या वाटचालीचा व व्यवसायवृद्धीचा धावता आलेख सभेपुढे सादर केला.

विषयपत्रिकेतील विषयासंदर्भातील ठराव संस्थेच्या संचालकांनी विस्तृतपणे सादर केले. सर्व ठराव एकमताने मंजूर करीत सर्व सभासदांनी संस्थेच्या कामकाजावर विश्वास व्यक्त केला. सभा होण्यापूर्वी ९७व्या घटना दुरुस्तीच्या अनुषंगाने सहकार कायद्यात करण्यात आलेल्या नवीन तरतुदीनुसार सभासद प्रशिक्षण आवश्यक करण्यात आल्याने सभासदांचे प्रशिक्षण घेण्यात आले.

बँक ऑफ इंडियाचे सुधीर गायकवाड, वरुणा हवालदार, प्रवीणकुमार यांनी आर्थिक साक्षरता, डिजिटल बँकिंग, धोके यावर मार्गदर्शन केले.

## तमिळ-मराठी साहित्याचा सेतू उभारणारे प्रकाश अधिकारी यांचा गौरव

**अलिबाग : प्रतिनिधी**

तमिळ भाषेतील दर्जेदार साहित्य मराठी वाचकांपर्यंत पोहोचविण्यासाठी अनुवाद क्षेत्रात भरीव योगदान देणारे ज्येष्ठ साहित्यिक प्रा. प्रकाश अधिकारी यांच्या साहित्यिक कार्याचा गौरव करण्यात आला. शब्दसृष्टी-अनुवादसृष्टीतर्फे प्राचार्य प्रकाश अधिकारी गौरव विशेषांक पनवेल येथे प्रकाशित करण्यात आला.



प्रख्यात साहित्यिक, समीक्षक व अनुवादक गजानन चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमाला हिंदी कवी व समीक्षक राजेशकुमार सिन्हा, साहित्यिक व अनुवादक प्रकाश भातंब्रेकर, पटकथालेखक व दिग्दर्शक पथीक वत्स तसेच ज्येष्ठ लेखक व अनुवादक चंद्रकांत भोंजाळ यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रास्ताविकात मुख्य संपादक डॉ. मनोहर यांनी शब्दसृष्टी-अनुवादसृष्टीच्या अनुवादविषयक उपक्रमांची माहिती देत प्रा. अधिकारी यांच्या साहित्यिक योगदानाचा गौरव केला. अध्यक्षीय भाषणात गजानन चव्हाण यांनी तमिळमधून मराठीत प्रा. अधिकारी यांनी केलेले गद्य व पद्य अनुवाद अद्वितीय आणि दिशादर्शक असल्याचे सांगितले.

प्रा. प्रकाश अधिकारी यांनी आपल्या साहित्यिक प्रवासातील प्रेरणादायी आठवणींना उजाळा दिला. शिक्षक डॉ. जी. रामकृष्ण, वडील चंद्रकांत अधिकारी आणि ज्येष्ठ साहित्यिक यदुनाथ थत्ते यांचे आपल्या वाटचालीतील योगदान त्यांनी आवर्जून नमूद केले. साने गुरुजींच्या आंतरभारती संकल्पनेतून तमिळ साहित्य मराठी वाचकांपर्यंत पोहोचविण्याचा आपला प्रयत्न असल्याचे प्रा. अधिकारी यांनी सांगितले. ज्ञानपीठ पुरस्कारप्राप्त तमिळ साहित्यिक वैरमुथू यांचे ध्वनिचित्रफितीद्वारे संदेश प्रसारण करण्यात आले. मूळ इंग्रजी भाषणाचा पूर्णा अधिकारी यांनी केलेला मराठी अनुवाद विशेष आकर्षण ठरला.


### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या नोटीसीद्वारे कळविणेत येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली मिळकत खाली नमूद केलेल्या इसमांकडून कायम खरेदी घेण्याचे ठरविले आहे.

तरी सदरहू मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेन्ट, साठेकरार, फरोक्त, खरेदीखत, गहाण, दान, बक्षिस, चार्ज, अटॅचमेंट, लीज वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाले पासून **१४ दिवसाच्या आत** आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषेद करुन कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क हितसंबंध नाही असे समजून आमचे आशिल सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल यांची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

मिळकतीचे वर्णन
मौजे मोर्बे, ता. पनवेल, जि. रायगड,

| सर्व्हे नंबर /गट नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रू.पै. | मालकाचे नाव |
|---|---|---|---|---|
| ७७ | १ | ० - ०६ - ००<br>पो.ख. ० - ०१ - ०० | ०.१२ | श्री. भाऊसाहेब नामदेव शिंगाडे |
| | एकूण | ० - ०७ - ०० | | |
| | | | | |
| ११२ | १/२/क | ० - ३० - ३०<br>पो.ख. ० - ०१ - ३० | ६.१९ | |
| | एकूण | ० - ३१ - ६० | | |

पनवेल.
दिनांक : ०२/०९/२०२६

सही/-
**ॲड. जयवंत एकनाथ भोपी**
**ॲडव्होकेट**
शॉप नं. १३, वरद विनायक कॉम्प्लेक्स,
प्लॉट नंबर ३, सेक्टर नंबर ५, गुरूद्वारा समोर,
नवीन पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड.
मो. नं. ९०२२३१७७७२.


## मुरूडमध्ये शांतता समितीची बैठक; सण-उत्सवात कायदा पाळण्याचे आवाहन

**मुरूड : प्रतिनिधी**

आगामी गोकुळाष्टमी, गणपती, गौरी आदी सण शांततामय वातावरणात सामाजिक सलोखा राखून सौहार्दाने साजरे व्हावेत. कुठेही कायदा व सुव्यवस्थेचा भंग होणार नाही याची काळजी घ्यावी. स्पीकर परवाना, डीजेची ध्वनी मर्यादा आदी बाबींची सर्व नागरिकांनी विशेष काळजी घ्यावी आणि शासन यंत्रणेला सहकार्य करावे, असे आवाहन मुरुड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक परशुराम कांबळे यांनी केले. मुरुड पोलीस ठाण्यातर्फे शांतता समितीची सभा बुधवारी (दि. २) तहसीलदार आदेश डफळ यांच्या अध्यक्षतेखाली दर्यासारंग सभागृहात आयोजित करण्यात आली होती. या सभेत ते बोलत होते.



यावेळी व्यासपीठावर तहसीलदार आदेश डफळ, मुख्याधिकारी सचिन बच्छाव, उपनगराध्यक्ष विरेंद्र भगत, पोलिस निरीक्षक परशुराम कांबळे, सहाय्यक पोलीस निरीक्षक भैरु जाधव, जिल्हा परिषद सदस्य विघ्नेश माळी, ज्योती नागावकर, पंचायत समिती सभापती निलेश घाटवळ, उपसभापती अश्विनी जंगम, भरत बेलोसे, तसेच जिल्हा शांतता समिती सदस्य राशीद फहीम, विद्युत वितरण, नगरपरिषद, पंचायत समिती, सार्वजनिक बांधकाम विभाग, एस. टी. महामंडळाचे पदाधिकारी आदी मान्यवर उपस्थित होते. सदर सभेत सर्वे-कशिद रस्त्यावर होणाऱ्या कामामुळे रहदारीस व्यत्यय येणे, मुरुड तालुक्यातील मोकाट गुरे, उनाड कुत्रे, घोडे यांचा बंदोबस्त करणे, गणपती कारखानदारांना थोडेच दिवस मिळणार असल्याने भारनियमन टाळून विद्युत पुरवठा खंडित न करणे, तवसाळकर लॉज जवळील रखडलेल्या मोरीचे काम तातडीने पूर्ण करणे, आगरदांडा, केळघर या रस्त्यावरील भराव पट्ट्या करणे, शिघ्रे ग्रामस्थांना गारंबी धरणाचे पाणी मिळणे, शहरातील अल्पवयीन घुमस्टाईल चालकांचा बंदोबस्त करणे, शांतता समितीचे इतिवृत्त उपलब्ध करून देणे, गुन्हे दाखल न करता समन्वय साधणे आदी मुद्दे सदस्यांनी मांडून अधिकाऱ्यांचे लक्ष वेधून घेतले.

या चर्चेमध्ये माजी मुख्याध्यापक शकील कडू, अरविंद गायकर, कुणाल सतवीडकर, घनश्याम श्रीवर्धनकर, वासंती उमरोटकर, यशवंत पाटील, श्रीकांत सुर्वे, संतोष सुर्वे, मनोज कमाने आदींनी सहभाग घेतला.मुरुड शहराला एक सांस्कृतिक ओळख असून पर्यटन नगरीत बंधुभाव राखून आगामी उत्सव, सण गुण्यागोविंदाने साजरा करण्याचे आवाहन जिल्हा परिषद सदस्य विघ्नेश माळी यांनी केले आणि शुभेच्छा दिल्या.

अध्यक्षीय भाषणात तहसीलदार आदेश डफळ यांनी सदस्यांच्या भावनांचा आदर करीत संबंधित अधिकाऱ्यांनी या लोकसमस्यांची सोडवणूक करण्यासाठी सक्त निर्देश दिले. कायद्यात राहाल तर फायद्यात राहाल, असे सांगताना गतवर्षीप्रमाणे यंदाही सतर्क राहून सण, उत्सव शांततेत साजरे करावेत आणि मुरुडला सशक्त, समृद्ध करून नावलौकिक वाढविण्याचे विनम्र आवाहन केले. तालुक्यातून ग्रामपंचायत सदस्य, सरपंच, उपसरपंच, ग्रामस्थ तसेच नागरिकांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली होती. शेवटी सहाय्यक पोलीस निरीक्षक भैरु जाधव यांनी उपस्थितांचे आभार मानले.


### पुनर्विकास निविदा सूचना
**श्री शिल्प सहकारी गृहनिर्माण संस्था पुनर्विकास योजना**

प्रस्तावित सहकारी संस्था ७९ (अे) इमारत पुनर्विकास योजने अंतर्गत अनुभवी, तांत्रिक व आर्थिकदृष्ट्या सक्षम, योग्य व पात्र विकासकांकडून जुनी / धोकादायक इमारत पाडून पनवेल महानगरपालिकेचे व युडीसीपीआर-२०२० च्या नियमांना अधीन राहून नवीन इमारत पुनर्विकासासंबंधी निविदा मागविणेत येत आहेत.

१) गृ. नि. संस्थेचे नाव : श्री शिल्प सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. पनवेल, (7755984879 / 9969228074 / 9653175519)

२) संस्थेचा पत्ता : श्री शिल्प सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., भुखंड क्र. ६८, टीपी स्कीम ०१ अंतिम भुखंड क्र. २०५/३७, गांधी हॉस्पिटलच्या मागे, एम. सी. सी. एच. सोसायटी, पनवेल, जि. रायगड- ४१०२०६.

३) संस्था नोंदणी क्र. : (Regd. No. RGD/PWL/HSG/TC/1497/2004-2005) दि. 11/05/2004

४) भुखंडाचे वर्णन : भुखंड क्र. ६८, टीपीएस ०१ अं. भु. क्र. २०५/३७ रहीवासी भुखंड एकुण क्षेत्र ५८६.०० चौ. मी.

५) अस्तित्वात असलेल्या इमारतीतील सदनिका / गाळयांची संख्या : १५ सदनिका असे ''एकुण = १५ युनिटस''

६) जुनी इमारत पूर्णत्वाची तारीख दिनांक : ३०/०४/२००२. (O.C. Received)

७) निविदा उपलब्धता व विक्री : पुनर्विकसनाबाबतच्या कोऱ्या निविदा दि. ०३/०९/२०२६ ते २३/०९/२०२६ चे दरम्यान (सुटीचे दिवस सोडून) पी.एम.सी. यांचेकडे सकाळी ११:०० ते सायंकाळी ६:०० दरम्यान व सायंकाळी ४:०० ते सायंकाळी ६:०० दरम्यान संस्थेच्या वरील पत्यावर मिळू शकतील.

८) निविदा कागदपत्रांचे मुल्य : विनापरतावा रु. ३०,०००/- (तीस हजार रुपये) डी. डी. किंवा पे ऑर्डर स्वरुपात देणे.

९) पी.एम.सी. कार्यालय : ॲड. सचिन मा. कल्याणकर ॲण्ड असोसिएटस, (पी.एम.सी.), पहीला मजला, प्लॉट क्र. १५६४, स्नेह रोहित सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., नवरंग फॅशनच्यावर रमेश हार्डवेअरच्या बाजूला, शिवाजी पुतळा सर्कलजवळ, पनवेल, जि. रायगड- ४१०२०६, मो. क्र. (९७६८३६६७१४/८१६९९६९१७५)

टिपः कोणत्याही निविदा स्विकारणेचा/नाकारणेचा/रद्द करण्याचा स्वाधिकार संस्थेच्या कार्यकारीणी/ समितीस असेल.

सही/-
**श्री शिल्प सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या.**
**प्लॉट नं.६८, पनवेल-रायगड**
**अध्यक्ष/सेक्रेटरी/खजिनदार**



### पनवेल येथे तातडीने भरती

भरती पदे

**लेखापाल (Accountant)**

**साईट इंजिनिअर (Site Engineer)**

**आर्किटेक्ट (Architect)**

**वकील (Lawyer)**

**कार्यालयीन कर्मचारी / लिपिक (Clerk)**

**अनुभवी उमेदवारांना प्राधान्य**

**स्थान: Panvel**

**संपर्क: +91 84518 27666**

**ईमेल:landmastergroup15@gmail.com**

**आपल्या करिअरला नवी दिशा!**

# झाडांना मिळणार मोकळा श्वास

## नवी मुंबईतील काँक्रीट हटवण्याचे आयुक्तांचे आदेश

**नवी मुंबई : बातमीदार**

पावसाळ्यात वृक्ष पडण्याच्या घटना रोखण्यासाठी आणि शहरातील वृक्षसंपदेचे शास्त्रोक्त जतन करण्यासाठी महापालिकेने विशेष मोहीम हाती घेतली आहे. वृक्षांच्या बुंध्याभोवतीचे काँक्रीट, डांबर आणि पेव्हर ब्लॉक हटवून किमान एक मीटर जागा मोकळी करण्याचे निर्देश आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी सोमवारी झालेल्या बैठकीत दिले.



मोठ्या वृक्षांसाठी दीड मीटरचे आळे तयार करण्याचे आदेशही त्यांनी दिले. आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या तज्ज्ञांच्या बैठकीत वृक्ष पडझडीची कारणे स्पष्ट झाली. वृक्षांच्या मुळांना पुरेशी जागा न मिळणे, विकासकामांमध्ये मुळे कापली जाणे, अशास्त्रीय छाटणी, सूर्यप्रकाशाच्या दिशेने वृक्ष झुकणे व अयोग्य प्रजातींची लागवड ही प्रमुख कारणे आहेत. रस्ते व गृहनिर्माण संस्थांच्या कामांमध्ये बुंध्यालगत सिमेंट, काँक्रीट किंवा पेव्हर ब्लॉक बसवल्याने पाणी मुरण्यास व मुळांच्या वाढीस अडथळा येतो. केबल, जलवाहिनी, मलनिस्सारण आणि गॅसवाहिन्यांसाठीच्या खोदकामात मुळांना इजा झाल्याने वृक्षांची पकड कमकुवत होते. सूर्यप्रकाश कमी मिळाल्यास वृक्ष प्रकाशाच्या दिशेने झुकतो, तर एका बाजूच्या फांद्या चुकीच्या पद्धतीने छाटल्यास दुसऱ्या बाजूला भार वाढून पडण्याचा धोका वाढतो.

या पार्श्वभूमीवर वृक्षांची छाटणी शास्त्रीय पद्धतीने करण्याचे व नव्या लागवडीसाठी स्थानिक प्रजातींना प्राधान्य देण्याचे आदेश देण्यात आले. विकासकामांतील खोदकाम उद्यान सहाय्यकांच्या नियंत्रणाखाली करावे आणि आवश्यकतेनुसार वृक्ष अधिकाऱ्यांची परवानगी घ्यावी. वृक्ष तोडणे किंवा स्थलांतरित करणे आवश्यक असल्यास वृक्ष प्राधिकरणाची पूर्वपरवानगी बंधनकारक राहील. विनापरवानगी वृक्षतोड केल्यास किंवा वृक्षाच्या जीवितास हानी पोहोचवल्यास महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) वृक्ष संरक्षण व जतन अधिनियम, १९७५ च्या कलम २१ (१) अन्वये कारवाई करण्याचा इशारा आयुक्तांनी दिला आहे.

वृक्षांचे सर्वेक्षण करून त्यांच्याभोवतीचे बांधकाम काढले जाणार आहे. वृक्षाभोवती किमान एक मीटर मोकळी जागा ठेवावी, मोठ्या वृक्षांसाठी दीड मीटरचे आळे करावे, आळ्यातील मातीची पातळी बाहेरील जमिनीपेक्षा किमान सहा इंच खाली ठेवावी व जमिनीचा उतार आळ्याकडे ठेवावा, जेणेकरून पावसाचे पाणी मुळांजवळ मुरेल. आळ्याभोवती वीट किंवा सिमेंटचे बांधकाम करू नये. नव्या रस्त्यांवर वृक्षलागवडीसाठीही प्रमाणक निश्चित करण्यात आले आहे.

२४ मीटरपेक्षा अधिक रुंदीच्या रस्त्यांवर प्रत्येक १० मीटर अंतरावर, १२ ते २४ मीटर रुंदीच्या रस्त्यांवर दुतर्फा प्रत्येक १० मीटर अंतरावर, तर ६ ते १२ मीटर रुंदीच्या रस्त्यांवर प्रत्येक २० मीटर अंतरावर वृक्षलागवड करावी. दुभाजकांमध्ये झुडुपे व रोपांसाठी चार ते पाच फूट जागा ठेवावी, जागा शक्य नसल्यास दुभाजक जोडून बांधावेत, असे निर्देश देण्यात आले आहेत.

# जुईनगर एमआयडीसीतील चोरी उघडकीस; आरोपीला अटक

**नवी मुंबई : बातमीदार**

जुईनगर एमआयडीसी क्षेत्रातील एका इलेक्ट्रॉनिक कंपनीत कामगारांच्या बॅगमधून रोख रक्कम व महागडे मोबाइल लांबवणाऱ्या सराईत चोरट्याला तुर्भे पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. मोहम्मद नजरेलम सिकंदर शेख (रा. वडाळा, मुंबई) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे.

जुईनगर एमआयडीसी येथील जीएनजी इलेक्ट्रॉनिक्स प्रा. लि. या कंपनीत इलेक्ट्रॉनिक उपकरणे व लॅपटॉप दुरुस्तीचे काम चालते. कंपनीच्या धोरणानुसार कर्मचाऱ्यांना आतमध्ये लॅपटॉप किंवा इलेक्ट्रॉनिक पार्ट्सच्या दुरुस्तीच्या ठिकाणी मोबाइल आणि बॅग नेण्यास सक्त मनाई आहे. त्यामुळे कंपनीत प्रवेश करताना सर्वांची तपासणी केली जाते आणि सर्व कामगार आपले मोबाइल व बॅगा बाहेर असलेल्या एकाच रूममध्ये ठेवून मगच आत कामासाठी जातात.



सोमवारी दुपारी १२.३० वाजेच्या सुमारास नेहमीप्रमाणे कर्मचाऱ्यांनी आपले मोबाइल व रोख रक्कम बाहेरील रूममधील बॅगांमध्ये ठेवली आणि ते आत दुरुस्तीच्या कामात व्यस्त झाले. आरोपी मोहम्मद नजरेलम सिकंदर शेख याने काही दिवस या कंपनीत काम केले असल्याने त्याला या सर्व नियमांची व सुरक्षिततेची पूर्ण माहिती होती. त्याने याच गोष्टीची पूर्वपाहणी करून संधी साधली आणि कर्मचाऱ्यांच्या बॅगांची तपासणी करत त्यात ठेवलेले महागडे मोबाइल व रोख रक्कम चोरून पोबारा केला.काम संपल्यानंतर कर्मचारी परत बाहेर आले असता बॅगांमधील मोबाइल व पैसे गायब असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले.

आरोपीने एकूण १२ महागडे मोबाइल आणि रोख रक्कमेसह विविध कर्मचाऱ्यांचा तब्बल ३,२४,००० रुपयांचा ऐवज लांबवला होता. याप्रकरणी फिर्यादी संस्कार कुणबी यांच्या तक्रारीवरून तुर्भे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. तपासादरम्यान आरोपी हा काही दिवसांपूर्वीच अवघे दोन दिवस जुईनगर एमआयडीसीतील या कंपनीत कामाला आला होता. अवघ्या दोन दिवसांच्या कामात त्याने सर्व व्यवस्थेची पाहणी केली आणि नियोजनबद्ध चोरी घडवून आणली.

तुर्भे पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनील शिंदे, सहायक पोलीस निरीक्षक वसीम शेख व गुन्हे प्रकटीकरण पथकाचे पोलीस उपनिरीक्षक निलेशकुमार वाघ व पोलीस अंमलदार संतोष टोळे यांच्या पथकाने अवघ्या काही तासांत आरोपीला वडाळा येथून ताब्यात घेऊन अटक केली.

## तुर्भे नाक्यावर घरफोडीत अडीच लाखांचा ऐवज लंपास

**नवी मुंबई : बातमीदार**

कुटुंब गावी गेले असताना तुर्भे नाका येथील हनुमाननगर, मसाला गल्ली भागात घरफोडीची घटना उघडकीस आली आहे. अज्ञात चोरट्याने बंद घराचा कडी-कोयंडा आणि कपाट तोडून दोन लाख ५९ हजार रुपयांचे सोन्या-चांदीचे दागिने व रोकड लंपास केली.

मिळालेल्या माहितीनुसार तक्रारदार घर बंद करून गावी गेले होते. २८ ऑगस्टच्या रात्री १०.३० ते २९ ऑगस्ट रोजी दुपारी १२.०० वाजेच्या दरम्यान चोरट्याने संधी साधून घरात प्रवेश केला.

## कोपरखैरणेत हुक्का बारवर पोलिसांची कारवाई

### मॅनेजरसह चौघांवर गुन्हा

**नवी मुंबई : बातमीदार**

कोपरखैरणे येथील बझिंगा लाउंज बारवर पोलिसांनी धाड टाकून बेकायदा हुक्का पार्लरचा पर्दाफाश केला आहे. रविवारी पहाटे ५.४०च्या सुमारास सेक्टर ४ मधील या बारमध्ये ही कारवाई करण्यात आली.

याप्रकरणी बारचे मॅनेजर महेश किसन सातवे (५०) यांच्यासह वेटर इद्रीस बहरुद्दीन आलम (२०), मोहम्मद मोहिबुर अनामुद्दीन रहमान (१९) आणि रूहूल अमिरुद्दीन इस्लाम (२५) या चौघांवर कोपरखैरणे पोलीस ठाण्यात कोटपा कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बझिंगा या आस्थापना चालकांकडून ग्राहकांच्या सुरक्षेची कोणतीही काळजी न घेता तसेच नो स्मोकिंग आणि निकोटिनबाबत जनजागृती फलक न लावता बंदी असलेले तंबाखूजन्य हुक्का फ्लेवर व साहित्य पुरवले जात असल्याचे आढळून आले.

या कारवाईदरम्यान पोलिसांनी विविध फ्लेवरचे डबे, चिलीम, हुक्का पॉट आणि रबरी पाइप असा एकूण ५,३०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.

## एसआयआरमध्ये नावे नसलेल्या मतदारांनी पडताळणी करावी

### [ आयुक्त रुबल अग्रवाल यांचे आवाहन ]

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

विशेष सखोल पुनरीक्षण अर्थात एसआयआर प्रक्रियेत कोकण विभागातील न सापडलेल्या मतदारांची प्रारूप यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे. कोकण विभागातील ७५ मतदारसंघांमध्ये एकूण दोन कोटी ४७ लाख ६२ हजार मतदार असून, त्यापैकी सुमारे ७९ लाख मतदार सध्या सापडलेले नाहीत, अशी माहिती विभागीय आयुक्त रुबल अग्रवाल यांनी दिली. संबंधित मतदारांची प्रारूप यादी विभागातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालयांच्या तसेच कोकण विभागाच्या संकेतस्थळावर नागरिकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात आली आहे. नागरिकांनी ही यादी तपासून आपले नाव त्यामध्ये आहे का, याची पडताळणी करावी, असे आवाहन कोकण विभागीय आयुक्त तथा एसआयआर निरीक्षक रुबल अग्रवाल यांनी केले आहे.

कोकण विभागात एसआयआर प्रक्रियेसाठी पाच जिल्ह्यांची जबाबदारी विभागीय आयुक्त रुबल अग्रवाल यांच्याकडे निरीक्षक म्हणून सोपविण्यात आली आहे. तर मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्ह्यांसाठी निरीक्षक म्हणून मराठी भाषा विभागाचे सचिव किरण कुलकर्णी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. एसआयआर प्रक्रियेत मतदारांच्या नावांची पडताळणी करताना ७९ लाख मतदार सध्या सापडलेले नाहीत. अशा मतदारांची नावे प्रारूप स्वरूपात प्रसिद्ध करण्यात आली असून त्यामुळे संबंधित मतदारांनी आपले नाव मतदार यादीतून वगळले गेले, असा गैरसमज करून घेऊ नये. ज्या पात्र नागरिकांचे नाव मतदार यादीत समाविष्ट करण्याची आवश्यकता आहे, त्यांनी विहित फॉर्म क्रमांक ६ भरून संबंधित मतदान नोंदणी अधिकारी कार्यालयात सादर करावा.

हे अर्ज संबंधित मतदान नोंदणी अधिकारी कार्यालयांमध्ये उपलब्ध करून देण्यात आले आहेत. एसआयआर प्रक्रियेदरम्यान नागरिकांना आपले म्हणणे मांडण्यासाठी दावे व हरकती दाखल करण्यासाठी ३० सप्टेंबरपर्यंत मुदत देण्यात आली आहे. त्यामुळे न सापडलेल्या मतदारांनी तसेच मतदार यादीबाबत काही दुरुस्ती किंवा हरकत असल्यास संबंधितांनी विहित मुदतीत आवश्यक अर्ज सादर करावेत, असेही आवाहन करण्यात आले आहे. कोकण विभागातील सर्व नागरिकांनी एसआयआर प्रक्रियेकडे गांभीर्याने पाहून प्रसिद्ध करण्यात आलेली प्रारूप यादी तपासावी, स्वतःचे तसेच आपल्या कुटुंबातील पात्र सदस्यांचे नाव मतदार यादीत आहे का, याची खात्री करावी आणि आवश्यकता असल्यास विहित मुदतीत दावा किंवा हरकत दाखल करावी.

मतदार यादी अधिक अचूक करण्यासाठी नागरिकांनी प्रशासनाला सहकार्य करावे. प्रत्येक पात्र नागरिकाचे नाव मतदार यादीत समाविष्ट होण्यासाठी प्रशासनाकडूनही आवश्यक सहकार्य करण्यात येईल, असेही विभागीय आयुक्त रुबल अग्रवाल यांनी स्पष्ट केले आहे.

## निवडक

### थारची रिक्षाला धडक; दोघे जखमी

**नवी मुंबई** : पनवेल-सायन महामार्गावर वाशी टोलनाक्याजवळ मंगळवारी सकाळी ११.०५ वाजण्याच्या सुमारास एका महिंद्रा थारचालकाने निष्काळजीपणे गाडी चालवून ऑटो रिक्षाला धडक दिल्याची घटना घडली. या अपघातात रिक्षातील दोघे जखमी झाले आहेत. कोपरखैरणे येथील रहिवासी श्रवण बाकेलाल जैस्वाल (२६) आपल्या आईवडिलांसह ऑटो रिक्षाने चेंबूरकडे जात होते. वाशी टोलनाक्याच्या १०० मीटर आधी महिंद्रा थारचालक लालूभाईने निष्काळजीपणाने गाडी चालवत रिक्षाला उजव्या बाजूने जोरदार धडक दिली. या अपघातात फिर्यादीचे वडील बाकेलाल जैस्वाल यांच्या छातीला, उजव्या हाताच्या खांद्याला गंभीर दुखापत झाली असून आई रामरती जैस्वाल यांच्या उजव्या हाताला किरकोळ दुखापत झाली. याप्रकरणी वाशी पोलीस ठाण्यात लालूभाईविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक वैभव रुपवते करीत आहेत.

### मोबाइल हिसकावून चोरटा पसार

**नवी मुंबई** : एपीएमसी क्षेत्रातील माथाडी चौक, सेक्टर-१९ येथे फोनवर बोलणाऱ्या माथाडी कामगाराचा मोबाइल अज्ञात मोटरसायकलस्वाराने हिसकावून पळवून नेल्याची घटना घडली. फिर्यादी गावी गेल्यामुळे घटनेची तक्रार उशिरा नोंदवण्यात आली असून मंगळवारी एपीएमसी पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. बोनकोडे येथील रहिवासी नानकचंद मिश्रा (५०) २० जूनला रात्री १.३० वाजण्याच्या सुमारास माथाडी चौक येथे कामावर असताना फोनवर बोलत होते. त्यावेळी सेक्टर-२६कडून मागून आलेल्या मोटरसायकलस्वाराने त्यांच्या हातातील मोबाइल लांबवला. घटनेनंतर फिर्यादी गावी गेल्यामुळे तत्काळ तक्रार देता आली नाही. गावाहून परतल्यानंतर त्यांच्या तक्रारीवरून मंगळवारी एपीएमसी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे. पोलीस अधिक तपास करीत आहेत.

### मुलीवरील अत्याचार; झीरो एफआयआर

**नवी मुंबई** : अल्पवयीन मुलीवर झालेल्या लैंगिक अत्याचाराच्या गंभीर प्रकरणात भांडुप पोलिसांनी तत्परता दाखवत झीरो एफआयआर नोंदवला. घटनेचे कार्यक्षेत्र रबाळे पोलीस ठाण्याच्या हद्दीत असल्याने हा गुन्हा रबाळे एमआयडीसी पोलिसांकडे वर्ग करण्यात आल. १६ वर्षीय पीडितेने तिच्यावरील अत्याचाराबाबत भांडुप पोलीस ठाण्यात आपबिती सांगितली. गुन्हा वर्ग होताच रबाळे पोलिसांनी पोक्सो कायद्यातील विविध कलमान्वये गुन्हा दाखल करीत राहुल नडगेरी (३०, रा. दिघा) या आरोपीला अटक करण्यात आली आहे. घटनेचा पुढील तपास रबाळे एमआयडीसी पोलीस करीत आहेत.

## रसायनी-पाताळगंगा परिसरात अण्णा भाऊ साठे जयंती उत्साहात

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या १०६व्या जयंतीनिमित्त रसायनी-पाताळगंगा परिसरात विविध कार्यक्रमांचे आयोजन करून जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. एच.ओ.सी. कॉलनी येथील साईबाबा मंदिर हॉलमध्ये झालेल्या या कार्यक्रमात अण्णा भाऊ साठे यांच्या जीवनकार्याबरोबरच छत्रपती शिवाजी महाराज, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिराव फुले आणि लहुजी वस्ताद साळवे यांच्या विचारांचा जागर करण्यात आला.



मोहोपाडा बाजारपेठेतील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. यावेळी छत्रपती शिवाजी महाराज, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे, महात्मा ज्योतिराव फुले यांच्यासह इतर महापुरुषांच्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला. यानंतर सरपंच रंजना गायकवाड यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला. तसेच अशोक खुडे यांच्या हस्ते अण्णा भाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. रसायनी एच.ओ.सी. कॉलनी येथील साईबाबा मंदिर हॉलमध्ये मुख्य कार्यक्रमाची सुरुवात झाली.

यावेळी सरपंच उमा मुंढे, जिल्हा परिषद सदस्य अनन्या गाताडे, सामाजिक कार्यकर्ते संदीप मुंढे, प्रमुख वक्ते सुधीर सोनवणे, राष्ट्रीय प्रबोधनकार इंजिनिअर पवन दवंडे महाराज, दीपक इंगळे, वासांबे ग्रामपंचायत उपसरपंच दीपक कांबळे, सामाजिक कार्यकर्ते प्रकाश गायकवाड यांची प्रमुख उपस्थिती होती. मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. त्यानंतर छत्रपती शिवाजी महाराज, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे, महात्मा ज्योतिराव फुले आणि लहुजी वस्ताद साळवे यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक माजी उपसरपंच विश्वनाथ गायकवाड यांनी केले.

यानंतर वासांबे ग्रामपंचायतीच्या सरपंच उमा मुंढे यांनी मनोगत व्यक्त करत अण्णा भाऊ साठे यांच्या जीवनकार्याची माहिती उपस्थितांना दिली. प्रमुख वक्ते सुधीर सोनवणे यांनी अण्णा भाऊ साठे यांच्या जीवनकार्य व साहित्यावर सविस्तर मार्गदर्शन केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी समितीचे विश्वनाथ गायकवाड, विनोद कांबळे, रोहित काळोखे, ललकार खवळे, काशिनाथ खुडे, समाधान खवळे, उमेश खुडे, गणेश गायकवाड, दिलीप खुडे, लंकेश खवळे यांच्यासह इतर कार्यकर्त्यांनी सहकार्य केले.

## निसर्गाशी नाते जोडण्यासाठी आयडब्ल्यूएसआयची ग्रीन कार्पेट योजना

**नवी मुंबई : बातमीदार**

शहरातील नागरिक, विद्यार्थी आणि शैक्षणिक संस्थांना निसर्गाच्या अधिक जवळ नेण्यासाठी इंडियन वुमन सायंटिस्ट्स असोसिएशनने आपल्या अनोख्या लर्निंग गार्डन-लिव्हिंग म्युझियमचा दरवाजा खुला केला आहे. जैवविविधता, पर्यावरण संवर्धन आणि शाश्वत जीवनशैलीचा प्रत्यक्ष अनुभव देणाऱ्या या उपक्रमाच्या जनजागृतीसाठी नॅटकनेक्ट फाउंडेशनने 'आउटरीच पार्टनर' म्हणून पुढाकार घेतला आहे.

या माध्यमातून शाळा, महाविद्यालये, गृहनिर्माण संस्था, रहिवासी संघटना, वास्तुविशारद, बांधकाम व्यावसायिक तसेच निसर्गप्रेमींसाठी मार्गदर्शित भेटी आयोजित करण्यात येणार आहेत. शहरातील मर्यादित जागेचाही शास्त्रीय नियोजन आणि योग्य लँडस्केपिंगच्या माध्यमातून जैवविविधतेने समृद्ध अधिवासात कसा विकास करता येतो याचे प्रात्यक्षिक या उद्यानातून पाहता येणार आहे. आयडब्ल्यूएसआयच्या परिसरात विस्तारलेल्या या लर्निंग गार्डनमध्ये ४५०हून अधिक वनस्पती प्रजाती आहेत. औषधी, खाद्य, सुगंधी आणि शोभेच्या वनस्पतींबरोबरच फळझाडे, फुलपाखरांना पूरक अधिवास, सेन्सरी गार्डन, पवित्र वनराई आणि परागीभवन करणाऱ्या कीटकांसाठी अनुकूल परिसर अशी विविध वैशिष्ट्ये येथे विकसित करण्यात आली आहेत.



सौरऊर्जा, पावसाचे पाणी साठवणे, कंपोस्टिंग आणि पाण्याचा कार्यक्षम वापर यामुळे हे उद्यान शाश्वत जीवनशैलीचेही उदाहरण ठरते. 'आमचे लर्निंग गार्डन म्हणजे केवळ वनस्पतींचा संग्रह नाही. हे जैवविविधता, विज्ञान, संवर्धन आणि शिक्षण यांचा संगम असलेले जिवंत संग्रहालय आहे. मुलांनी आणि नागरिकांनी निसर्गाविषयी केवळ वाचू नये, तर तो प्रत्यक्ष अनुभवावा हा आमचा उद्देश आहे,' असे आयडब्ल्यूएसआयच्या अध्यक्षा डॉ. नूतन भाकळ यांनी सांगितले. आयडब्ल्यूएसआयच्या सचिव प्रिया जेकब यांनी हे उद्यान भावी पिढीला निसर्गाचे संरक्षक बनविण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे असल्याचे सांगितले. 'लर्निंग गार्डनमुळे अनेक तरुणांना प्रश्न विचारण्याची, उत्तरे शोधण्याची आणि परिसंस्थांचा सखोल अभ्यास करण्याची प्रेरणा मिळाली आहे. त्यामुळे निसर्गसंवर्धनाच्या सामूहिक जबाबदारीची जाणीव निर्माण होते,' असे त्या म्हणाल्या.




### रंग पावसाचा

निळ्या नितळाईवर पसरले कृष्णरंगी मेघ,
लागली शर्यत पशुपक्ष्यांची, घेतले त्यांनी वेग!

हसू लागले झाडे-डोंगर, नाचू लागली पर्ण,
सुगंधीत झाली धारा, अन् तृप्त झाले कर्ण!

बेरंगी पर्जन्याने उधळले, चोहीकडे रंग,
नाद विजेचा घुमू लागला, मोराच्या चाली संग!

कस्तुरी मृगासमान, दरवळला मृदेचा सुगंध,
तप्तलेल्या धरेचेही, हरपले अश्रुगंध!

सुटली होडी कागदाची, बालकांच्या डबक्यात,
जमली सभा रंगबीरंगी छत्र्यांची, बेभान माणसांच्या गलक्यात!

जगाची म्हणा वा मनाची म्हणा, झाली आता शुद्धी,
सारे हरित करून, शांत झाल्या पावसाच्या सरी!



-कार्तिकी संदीप
आंग्रे, पनवेल

# अचूक मतदार यादीसाठी नागरिकांनी सहकार्य करावे -जिल्हाधिकारी जावळे

## नावांबाबत हरकती व दावे असल्यास सादर करण्याचे आवाहन

**रायगड : रामप्रहर वृत्त**

विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमांतर्गत (एसआयआर) प्रारुप मतदार यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे. मतदार यादी अधिक अचूक, अद्ययावत आणि सर्वसमावेशक करण्यासाठी नागरिकांनी ती तपासून आवश्यक असल्यास विहित मुदतीत दावे व हरकती सादर कराव्यात, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी किशन जावळे यांनी केले आहे. जिल्हाधिकारी कार्यालयात ते पत्रकार परिषदेत बोलत होते. यावेळी उपजिल्हाधिकारी (निवडणूक) नितीन वाघमारे उपस्थित होते.



जिल्ह्यातील सात विधानसभा मतदारसंघातील मतदान केंद्र ठिकाणी/पदनिर्देशित ठिकाणी मतदार नोंदणी अधिकारी यांच्यामार्फत ३१ ऑगस्ट रोजी यादीभाग निहाय प्रारुप मतदार यादी प्रसिध्द करण्यात आल्या आहेत. जिल्ह्यामध्ये डिजिटायझेशननंतर १९ लाख ४९ हजार ३४१ इतके मतदार आढळून आलेले आहेत.

पनवेल विधानसभा मतदारसंघात एकूण मतदान केंद्र ५४५, एकूण मतदार सहा लाख ८४ हजार ०९५, गणना प्रपत्राचे डिजिटायझेशन न झालेले मतदार चार लाख ५६६, गणना प्रपत्राचे संकलन करता आले नाही असे मतदार दोन लाख ८३ हजार ३५६, मॅन न झालेले मतदार ८९ हजार १७४, अनॉमाली ६१ हजार १०० आहेत.

कर्जत विधानसभा मतदार संघात एकूण मतदान केंद्रे ३६२, एकूण मतदार ३ लाख १९ हजार ३३७, गणना प्रपत्राचे डिजीटायझेशन न झालेले मतदार २ लाख ५७ हजार ४४२, गणना प्रपत्राचे संकलन करता आले नाही असे मतदार ६१ हजार ८८१, मॅन न झालेले मतदार १५ हजार ७९१, अनॉमाली १७ हजार ४९७ माणगाव.

उरण विधानसभा मतदारसंघात एकूण मतदान केंद्र ३५२, एकूण मतदार तीन लाख ५७ हजार २५५, गणना प्रपत्राचे डिजिटायझेशन न झालेले मतदार दोन लाख ७२ हजार ७७२, गणना प्रपत्राचे संकलन करता आले नाही असे मतदार ८४ हजार ४१६, मॅन न झालेले मतदार ३७ हजार २२७, अनॉमाली २१ हजार ४१९ आहेत.

पेण विधानसभा मतदारसंघात एकूण मतदान केंद्र ३७८, एकूण मतदार तीन लाख पाच हजार ३४३, गणना प्रपत्राचे डिजिटायझेशन न झालेले मतदार दोन लाख ६८ हजार २१७, गणना प्रपत्राचे संकलन करता आले नाही असे मतदार ३७ हजार १२२, मॅन न झालेले मतदार १३ हजार ७१५, अनॉमाली १६ हजार ६६६ आहेत.

अलिबाग विधानसभा मतदारसंघात एकूण मतदान केंद्र ३७३, एकूण मतदार तीन लाख नऊ हजार ५८०, गणना प्रपत्राचे डिजिटायझेशन न झालेले मतदार दोन लाख ६६ हजार ८००, गणना प्रपत्राचे संकलन करता आले नाही असे मतदार ४२ हजार ७६०, मॅन न झालेले मतदार १८ हजार ९२५, अनॉमाली २३ हजार ७९८ आहेत.

श्रीवर्धन विधानसभा मतदारसंघात एकूण मतदान केंद्र ३४५, एकूण मतदार तीन लाख ६२ हजार ६८०, गणना प्रपत्राचे डिजिटायझेशन न झालेले मतदार दोन लाख ३३ हजार ५६४, गणना प्रपत्राचे संकलन करता आले नाही असे मतदार २९ हजार ११५, मॅन न झालेले मतदार १० हजार ७७५, अनॉमाली १४ हजार ८५ आहेत.

महाड विधानसभा मतदारसंघात एकूण मतदान केंद्र ३९२, एकूण मतदार दोन लाख ९५ हजार ४४९, गणना प्रपत्राचे डिजीटायझेशन न झालेले मतदार दोन लाख ४९ हजार ९८०, गणना प्रपत्राचे संकलन करता आले नाही असे मतदार ४५ हजार ४६८, मॅन न झालेले मतदार १२ हजार ७३४, अनॉमाली २९ हजार ६९८ आहेत.

अशी जिल्ह्यात एकूण मतदान केंद्र दोन हजार ७४७, एकूण मतदार २५ लाख ३३ हजार ७३९, गणना प्रपत्राचे डिजिटायझेशन न झालेले मतदार १९ लाख ४९ हजार ३४१, गणना प्रपत्राचे संकलन करता आले नाही असे मतदार पाच लाख ८४ हजार ११८, मॅन न झालेले मतदार एक लाख ९८ हजार ३४१, अनॉमाली १ लाख ८४ हजार २६३ आहेत.

ज्या पात्र मतदारांची नावे वर नमूद प्रारुप मतदार यादीमध्ये आढळून येणार नाही किंवा जे नव मतदार असतील त्यांना दावे व हरकती ३१ ऑगस्ट ते ३० सप्टेंबर या कालावधीत संबंधित मतदार नोंदणी अधिकारी यांच्याकडे दाखल करता येतील. मतदार यादीत नाव समाविष्ट करण्यासाठी नमुना ६ (त्यासोबतच्या घोषणापत्र व आवश्यक कागदपत्रासह) भरण्याची सुविधा उपलब्ध राहील. मतदार नोंदणी अधिकारी यांच्याकडून या अर्जाची पडताळणी करुन पात्र मतदारांची नावे अंतिम मतदार यादीत समाविष्ट करण्यात येतील.

या एका महिन्याच्या कालावधीत (दावे व हरकतीचा कालावधी) मतदार यादीत नाव समाविष्ट करण्यासाठी किंवा नोंदीमध्ये दुरुस्ती करण्यासाठी संबंधित मतदार अनुक्रमे नमुना ६ किंवा नमुना ८ भरु शकेल तसेच संबंधित मतदार संघातील कोणताही मतदार सदर यादीतील कोणतीही नोंद वगळण्यासाठी नमुना ७ भरुन हरकती घेऊ शकेल. राजकीय पक्षांना प्राप्त दावे व हरकतींची यादी प्रत्येक आठवड्यास उपलब्ध करुन देण्यात येतील.

### असा आहे कार्यक्रम

***भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार राज्यातील सर्व विधानसभा मतदारसंघात १ ऑक्टोबर या अर्हता दिनांकावर आधारित मतदार याद्यांचा एसआयआर कार्यक्रम सुधारित वेळापत्रकानुसार राबविण्यात येत आहे. यामध्ये प्रारुप मतदार याद्या जाहीर केल्यानंतर दावे व हरकती दाखल करण्याचा कालावधी ३१ ऑगस्ट ते ३० सप्टेंबर असा आहे. नोटीस टप्पा/दावे व हरकती निकालात काढण्यासाठी ३१ ऑगस्ट ते २९ ऑक्टोबर अशी मुदत असून अंतिम मतदार याद्यांची प्रसिद्धी ४ नोव्हेंबरला केली जाणार आहे.***

मतदार नोंदणी अधिकारी/सहायक मतदान नोंदणी अधिकारी हे मतदारांनी केलेल्या दावे व हरकतीची सुनावणी ३१ ऑगस्ट ते २९ ऑक्टोबर या कालावधीत घेऊन दावे व हरकतींवर निर्णय घेतील. अंतिम मतदार यादी ४ नोव्हेंबर रोजी प्रसिध्द करण्यात येणार आहे. मतदार नोंदणी अधिकारी यांच्या निर्णयाविरुध्द प्रसिध्दी दिनांकपासून १५ दिवसांच्या आत लोकप्रतिनिधीत्व अधिनियम १९५०मधील नियम २४ अंतर्गत अपीलीय अधिकारी जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी, रायगड यांच्याकडे स्वतः हजर राहून अपिल अर्ज दाखल करण्याबाबतची तरतूद आहे तसेच जिल्हाधिकारी यांच्या निर्णयाविरूध्द मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र यांच्याकडे जिल्हाधिकारी यांच्या निर्णयाचे दिनांकापासून १५ दिवसांचे आत अंतिम अपील करू दाखल करू शकतात.

मतदार यादीच्या अनुषंगाने नाव समाविष्ट करणे, सुधारणा करणे किंवा नाव वगळण्यासाठी अर्ज करताना चुकीची घोषणा/विधान केल्यास संबंधित व्यक्ती एक वर्षापर्यंतची शिक्षा किंवा दंड किंवा दोन्ही यांना पात्र ठरते याची सर्व नागरिकांनी नोंद घ्यावी, असे जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी स्पष्ट केले.

## चौक-कर्जत मार्गावरील अतिक्रमणावर कारवाई



**नेरळ : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील चौक ते कर्जत या मार्गावरील रस्त्यालगतची अनधिकृत अतिक्रमणे प्रशासनाने जेसीबीच्या सहाय्याने हटवली. उच्च न्यायालयाच्या निर्देशांनुसार व राज्य शासनाच्या आदेशानुसार ही मोहीम राबविण्यात आल्याची माहिती तहसीलदार अभय चव्हाण यांनी दिली.

चौक आणि वावर्ले ग्रुप ग्रामपंचायतीच्या हद्दीतील टपऱ्या, हातगाड्या व अनधिकृत बांधकामांना काही दिवसांपूर्वी नोटिसा देण्यात आल्या होत्या. काही व्यावसायिकांनी स्वखुशीने अतिक्रमण काढले; मात्र काहींनी दुर्लक्ष केल्याने महसूल, सार्वजनिक बांधकाम विभाग, पोलीस व महावितरण यांच्या संयुक्त पथकाने तोडक कारवाई केली.

कारवाईदरम्यान काही दुकानदारांनी आक्षेप घेतला. त्यामुळे परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते; मात्र पोलिसांनी परिस्थिती नियंत्रणात ठेवत कारवाई शांततेत पूर्ण केली.

या मोहिमेत तहसीलदार अभय चव्हाण, नायब तहसीलदार सुधाकर राठोड, सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपकार्यकारी अभियंता संदेश पाटील, पोलीस निरीक्षक प्रदीप रायन्नावार, मंडळ अधिकारी माणिक सानप तसेच महसूल, पोलीस, महावितरण व सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी व कर्मचारी सहभागी झाले होते.

## सचिन राऊळ यांच्या जनसंपर्क कार्यालयाचा शुभारंभ

**रेवदंडा** : जिल्हा परिषद सदस्य डॉ. सचिन राऊळ यांच्या नागाव येथील जनसंपर्क कार्यालयाचा उद्घाटन नुकतेच आमदार महेंद्र दळवी यांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमास जि.प.सदस्य अनंत गोंधळी, शिवसेना उपजिल्हा प्रमुख शैलेश चव्हाण, पंचायत समिती सदस्य शरद गोंधळी, पंचायत समिती सदस्य अंकिता घरत, संतोष निगडे, छाया आचरेकर, नारायण मुंबईकर, महिला संघटक तनुजा मोरे-घरत, चौल शिवसेना महिला शाखा प्रमुख ज्योती मुंबईकर, नागाव ग्रा.प.सदस्य अंकिता शेवडे, मनोहर ठाकूर, सौरभ आपटे, मंगेश ठाकूर, रणजीत धरणकर, शरद राऊळ, सदिच्छा राऊळ आदी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थिती होते. उपस्थितांनी डॉ. राऊळ यांना शुभेच्छा दिल्या.

# धोकादायक विद्युत वाहिन्यांचा प्रश्न मार्गी

## जांभूळपाड्यात पोल उभारून महावितरणची कार्यवाही



**सुधागड : रामप्रहर वृत्त**

सुधागड तालुक्यातील जांभूळपाडा येथील आनंद धाम परिसरात विद्युत वाहिन्या रस्त्यालगत धोकादायक स्थितीत लोंबकळत होत्या. याबाबत वृत्त प्रसिद्ध होताच महावितरणने दखल घेत या विद्युत वाहिन्यांचा प्रश्न मार्गी लावला आहे.

रस्त्यालगत कमी उंचीवर आलेल्या विद्युत तारांमुळे नागरिक तसेच वाहनचालकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला होता. या मार्गावर शाळकरी विद्यार्थी, वयोवृद्ध नागरिक आणि वाहनांची मोठ्या प्रमाणात ये-जा होत असल्याने संभाव्य दुर्घटनेचा धोका लक्षात घेऊन ही बाब वृत्तातून प्रशासनाच्या निदर्शनास आणून देण्यात आली.

वृत्ताची दखल घेत महावितरणने तातडीने कार्यवाही केली. ज्या ठिकाणी विद्युत पोलची आवश्यकता होती, त्या ठिकाणी नवीन पोल उभारण्यात आला, तर खाली आलेल्या व लोंबकळणाऱ्या विद्युत तारांची सुरक्षित व्यवस्था करण्यात आली. आवश्यक त्या ठिकाणी विद्युत वाहिन्यांची दुरूस्तीही करण्यात आली. याबद्दल महावितरणला नागरिकांनी धन्यवाद दिले.

# रोहा प्राथमिक शिक्षक सहकारी पतपेढीची सभा; गुणवंतांचा गौरव

**रोहा : प्रतिनिधी**

रोहा प्राथमिक शिक्षक सहकारी पतपेढीची ५०वी वार्षिक सर्वसाधारण सभा नुकतीच ज्येष्ठ नागरिक सभागृहात आयोजित करण्यात आली होती. यावेळी गुणवंत शिक्षक व विद्यार्थ्यांचा गौर आणि सेवानिवृत्तांचा सन्मान करून शुभेच्छा देण्यात आल्या.



या सभेस चेअरमन नारायण गायकर, व्हाईस चेअरमन प्रशांत चोरगे, चिटणीस सचिन मुसळे, सहचिटणीस समिक्षा जुवेकर, संचालक संतोष यादव, अजय कापसे, प्रदीपकुमार खाडे, किशोर जाधव, शशिकांत शेळके, विजय धोत्रे, ईश्वर लाडे, सुनील चोगले, ब्रिजेश भादेकर, अमिता बामणे, जयेश भोईर, विलास सुटे, सुरेश मोरे, नागोठकर, पोटे, प्रतीक्षा मोरे, सीमा कळमकर, अरुणा लाड, तपकिरे, जाधव, खरीवले, डोलकर, विनायक शिंदे, अरुण आगळे यांच्यासह संचालक मंडळ, सभासद आदी उपस्थित होते.

रायगड जिल्हा शिक्षण व क्रीडा समिती स्वीकृतपदी सदस्य निवड झाल्याबद्दल या सभेत संतोष यादव यांचा सत्कार करण्यात आला. सभासदांच्या दहावी, बारावी, उच्च शिक्षण पूर्ण केलेले मुलांचे सत्कार करण्यात आला. विविध स्पर्धेत यश संपादन केलेल्या व सेवानिवृत्त शिक्षकांनाही सन्मानित करण्यात आले.

मान्यवरांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचलन समीर जुवेकर यांनी केले, तर उपस्थितांचे आभार सुनील चोगले यांनी मानले.

## वावे येथे ट्रान्सफॉर्मरचे भूमिपूजन

**रेवदंडा : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील वावे येथे वीजपुरवठा सुरळीत करण्याच्या दृष्टीने १०० केव्ही क्षमतेचा नवीन ट्रान्सफॉर्मर बसविण्यात येत आहे. या कामाचे भूमिपूजन नुकतेच ग्रामस्थांच्या उपस्थितीत करण्यात आले.

कार्यक्रमास पंचायत समिती सदस्य संतोष निगडे, शिवसेना ज्येष्ठ नेते दत्तात्रेय भोपी, बेलोशी ग्रामपंचायतीचे माजी सदस्य सुभाष वारगे, जगदीश भोपी, हरिश्चंद्र गावंड, विशाल आरकशी, अनिल गावंड, सुनाथ पाटील, देवदास राऊत, पोलीस पाटील दिनेश राऊत, महाजने युवासेना शाखाप्रमुख प्रितेश पारंगे, नितीन गावंड, शरद गावंड, महावितरणचे लाईनमन सिद्धेश्वर पवार, मनीष तांबडे, सुहास गावंड यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

नवीन ट्रान्सफॉर्मरमुळे परिसरातील नागरिकांना अधिक सुरळीत वीजपुरवठा मिळण्यास मदत होणार असून, वीजपुरवठ्याशी संबंधित समस्या कमी होण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली.



## तंटामुक्ती समितीच्या अध्यक्षपदी विशाल गुरव

**पाली : प्रतिनिधी**

वऱ्हाड-जांभुळपाडा ग्रुप ग्रामपंचायतीच्या ग्रामसभेत तंटामुक्ती समितीच्या अध्यक्षपदी विशाल रवींद्र गुरव यांची बहुमताने निवड करण्यात आली आहे. ते भाजपचे सुधागड तालुका चिटणीस म्हणून कार्यरत आहेत.

"गावातील तंटे वाढण्यापूर्वीच संवादातून ते सोडविणे, दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेणे आणि गावातील सलोखा कायम ठेवणे ही तंटामुक्ती समितीची खरी भूमिका आहे. विशाल गुरव यांच्यातील स्पष्टवक्तेपणा आणि गावपातळीवरील अनुभवाचा समितीला निश्चितच फायदा होईल," असा विश्वास भाजपचे ज्येष्ठ नेते प्रकाश देसाई यांनी व्यक्त केला.



ग्रामस्थ, महिला आणि युवकांनी गुरव यांच्या निवडीचे स्वागत करून त्यांच्या माध्यमातून गावातील तंटे सामोपचाराने मिटतील आणि गावातील सामाजिक सलोखा अधिक दृढ होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली. यावेळी उपस्थित सर्वांनी गुरव यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# कुणबी समाजातील डॉक्टर आणि विद्यार्थ्यांचा गुणगौरव

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तालुका कुणबी समाज साले ग्रुप आयोजित समाजातील शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील दहावी व बारावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा व समाजातील वैद्यकीय क्षेत्रात प्राविण्य मिळविलेल्यांचा सत्कार समारंभ नुकताच झाला.




कार्यक्रमाचे आयोजन कुणबी भवन माणगाव येथे तालुका कुणबी समाज विकास मंडळाचे अध्यक्ष महादेव बक्कम यांच्या हस्ते व साले ग्रुपचे अध्यक्ष सुभाष गुगले यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले होते.

कार्यक्रमास कुणबी समाज विकास मंडळाचे खजिनदार रामभाऊ टेंबे, सदस्य गंगाराम उभारे, साले ग्रुपचे उपाध्यक्ष राजू शेडगे, दिलीप जाधव, चंद्रकांत उभारे, सहसचिव कृष्णा पानवकर, समाज नेते सहदेव बक्कम, भारत पवार, मंगेश पवार, संजय बक्कम, मुकुंद वाढवळ, योगेश भोनकर, राजेंद्र जाधव, नथुराम मोरे आदींसह समाज बांधव-भगिनी, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन व आभार विघवली शाळेचे शिक्षक कृष्णा पानवकर यांनी व्यक्त केले.

यावेळी महादेवराव बक्कम यांनी सुरुवातीलाच कुणबी समाजातील ज्येष्ठ नेत्यांच्या आठवणींना उजाळा दिला. ते पुढे म्हणाले की, विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करण्याचे काम समाजातील नेते करीत असून विद्यार्थ्यांनी आपल्या भावी आयुष्यात खूप अभ्यास करून मोठे होऊन आई-वडिलांबरोबरच समाजाचे नाव उज्वल करावे.

# साऊथ झोन दुलिप ट्रॉफीच्या फायनलमध्ये



## जेतेपदासाठी ईस्ट झोन संघाशी भिडणार

**बंगळुरू : वृत्तसंस्था**

तिलक वर्माच्या नेतृत्वाखालील साऊथ झोनने दुलीप ट्रॉफीच्या दुसऱ्या उपांत्य फेरीत नॉर्थ झोनचा पराभव करत फायनलमध्ये धडक मारली. बंगळुरूच्या बीसीसीआय सेंटर ऑफ एक्सलन्स ग्राउंड २वर रंगलेल्या या सामन्यात तिलक वर्माने चौकार ठोकत अर्धशतक पूर्ण केले आणि साऊथ झोनच्या विजयावर शिक्कामोर्तब केले. आता जेतेपदासाठी त्यांचा सामना ईशान किशन आणि वैभव सूर्यवंशीच्या ईस्ट झोन संघाशी रंगणार आहे.

कन्हैया वाधवानच्या नेतृत्वाखालील नॉर्थ झोनचा संघ पहिल्या डावात १९५ धावांत आटोपला होता. तिलक वर्माच्या नाबाद ११६ धावांच्या खेळीच्या जोरावर साउथ झोनने पहिल्या डावात ३१२ धावा करत ११७ धावांची आघाडी घेतली. दुसऱ्या डावात नॉर्थ झोनचा संघ २९७ धावांवर गारद झाल्यानंतर तिलकच्या संघासमोर चौथ्या आणि अखेरच्या दिवशी १८० धावांचे लक्ष्य होते.

या धावांचा पाठलाग करताना रिकी भुईने ४२ (५३) आणि नारायण जगदीशनने ४३ (८३) धावांची खेळी करत संघाला चांगली सुरुवात करून दिली. त्यानंतर तिलक वर्माने ७९ चेंडूंत नाबाद ५१ धावांची खेळी करत साउथ झोनला सात विकेट्स राखून विजय निश्चित केला. स्मरण रविचंद्रन याने ४२ चेंडूंत ३२ धावांवर नाबाद राहिला.

ईशान किशन आणि वैभव सूर्यवंशीच्या ईस्ट झोन संघाने पहिल्या उपांत्य फेरीत रजत पाटीदारच्या नेतृत्वाखालील गतविजेत्या सेंट्रल झोनचा पराभव करत फायनल गाठली होती. आता तिलक वर्माच्या नेतृत्वाखालील साउथ झोननेही फायनलमध्ये धडक मारली आहे. जेतेपदासाठी दोन्ही संघांमधील अंतिम लढत ६ सप्टेंबरपासून चेन्नईतील एम.ए. चिदंबरम स्टेडियमवर रंगणार आहे.

# पाकिस्तान क्रिकेट निवड समिती सदस्य मिस्बाहचा राजीनामा

**इस्लामाबाद : वृत्तसंस्था**

पाकिस्तान क्रिकेटमध्ये गेल्या २४ तासांत घडलेल्या घटनांनी क्रिकेटविश्वाचे लक्ष वेधून घेतले आहे. इंग्लंड दौऱ्यावर असलेल्या पाकिस्तान संघातील तब्बल सात खेळाडूंना संघातून मुक्त करून मायदेशी परत पाठवण्यात आले आहे. त्यानंतर आता पाकिस्तानचा माजी कर्णधार आणि राष्ट्रीय निवड समितीचा सदस्य मिस्बाह-उल-हकने राजीनामा दिल्याची माहिती समोर आली आहे.

या घडामोडींमुळे पाकिस्तान क्रिकेट बोर्ड (पीसीबी) आणि संघाच्या व्यवस्थापनातील अंतर्गत मतभेद पुन्हा चर्चेत आले आहेत. कसोटी संघ आणि प्रशिक्षक वर्गात अचानक करण्यात आलेल्या बदलांमुळे पाकिस्तानच्या ड्रेसिंग रूममध्येही अस्वस्थता निर्माण झाल्याचे चित्र आहे.

मिळालेल्या माहितीनुसार मिस्बाह-उल-हकने आपल्या राजीनाम्याच्या निर्णयाची माहिती पाकिस्तान क्रिकेट बोर्डाला दिली आहे, मात्र त्याने औपचारिकपणे पद सोडण्यापूर्वी नियमानुसार





नोटीस कालावधी पूर्ण करणार असल्याचे सांगितले जात आहे. दरम्यान, वृत्तानुसार मिस्बाहने राजीनामा सादर केला असला तरी पीसीबीने तो अद्याप स्वीकारलेला नाही. त्यामुळे बोर्ड यावर पुढे काय निर्णय घेणार, याकडे क्रिकेट चाहत्यांचे लक्ष लागले आहे.

संघात एवढे मोठे बदल करण्यात येत असताना निवड समितीचा सदस्य म्हणून आपल्याशी पुरेशी चर्चा करण्यात आली नसल्याने मिस्बाह नाराज असल्याची माहिती समोर आली आहे. त्यानंतरच त्याने राजीनाम्याचा निर्णय घेतल्याचे वृत्त आहे.

# क्विंटन डी कॉकचा शतकी धमाका

## कोहली-वॉर्नरच्या खास विक्रमाशी बरोबरी

**बासेतेरे : वृत्तसंस्था**

कॅरेबियन प्रीमियर लीगममध्ये बारबाडोस ट्रायडेंट्सच्या ताफ्यातून खेळणाऱ्या दक्षिण आफ्रिकेचा स्टार विकेटकीपर बॅटर क्विंटन डी कॉकने सेंट



किट्स अँड नेविस पॅट्रियट्स संघाविरुद्ध शतकी खेळी केली. यासह त्याने विराट कोहली आणि डेविड वॉर्नर यांच्या विक्रमाची बरोबरी साधली आहे.

डी कॉकने या सामन्यात ५७ चेंडूत १०६ धावांची दमदार खेळी केली. हे त्याच्या टी-२० कारकिर्दीतील १०वे शतक ठरले. भारताचा स्टार बॅटर विराट कोहली आणि ऑस्ट्रेलियाचा स्फोटक सलामीवीर डेविड वॉर्नरच्या खात्यातही १० शतकांची नोंद आहे. टी-२० कारकिर्दीतील ४५७व्या सामन्यात डी कॉकने शतकांचा दुहेरी आकडा गाठला.

टी-२० क्रिकेटमध्ये सर्वाधिक शतकांचा विक्रम हा युनिवर्सल बॉस आणि वेस्ट इंडिजचा धाकड फलंदाज ख्रिस गेलच्या नावे आहे. त्याने आपल्या कारकिर्दीत छोट्या फॉरमॅटमध्ये २२ शतके झळकावली आहेत. पाकिस्तान कसोटी संघाचा कर्णधार बाबर आझम या यादीत दुसऱ्या स्थानावर असून त्याच्या खात्यात १३ शतकांची नोंद आहे.

डी कॉकच्या शतकी खेळीच्या जोरावर पहिल्यांदा फलंदाजी करताना बारबाडोसच्या संघाने निर्धारित २० षटकात २१७ धावा केल्या होत्या, पण सेंट किट्स अँण्ड नेविस पॅट्रियट्स संघाने या धावांचा यशस्वी पाठलाग करत दमदार विजय नोंदवला. जॉनसन चार्ल्सची ७८ धावांची खेळी डी कॉकच्या शतकावर भारी पडली.

# अलिबागमध्ये रायसोनी स्मृती चषक बुद्धिबळ स्पर्धा

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा बुद्धिबळ संघटनेच्या सहकार्याने जी.एच. रायसोनी स्मृती चषक बुद्धिबळ स्पर्धेचे आयोजन ६ सप्टेंबर रोजी भाग्यलक्ष्मी हॉल, चेंढरे, अलिबाग येथे सकाळी ९.३० वाजता करण्यात आले आहे. स्पर्धा १३ वर्षांखालील, १७ वर्षांखालील आणि खुल्या गटात रॅपिड पद्धतीने होणार आहे.

स्पर्धेसाठी ४० हजार १०० रुपयांची रोख बक्षिसे, ४७ ट्रॉफी आणि पदके देण्यात येणार आहेत. १३ वर्षांखालील गटासाठी ७,८०० रुपये, १७ वर्षांखालील गटासाठी १०,३०० रुपये आणि खुल्या गटासाठी २२ हजार रुपयांची बक्षिसे ठेवण्यात आली आहेत. सात वर्षांखालील सहभागी सर्व खेळाडूंना पदके देण्यात येणार आहेत.

प्रवेश शुल्क खुला गट ५५० रुपये, १७ वर्षांखालील ५०० रुपये आणि १३ वर्षांखालील गटासाठी ४५० रुपये आहे. प्रवेशाची अंतिम मुदत ४ सप्टेंबर असून गुगल फॉर्मद्वारे नोंदणी करावी. अधिक माहितीसाठी चंद्रशेखर पाटील (९३२६५०४१७९), सुशील गुरव (९८२२७७४२७८) किंवा आविष्कार मरभळ (९६५७१८६७७८) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन अध्यक्ष विलास एकनाथ म्हात्रे यांनी केले आहे.

# अमेरिकन ओपन : अल्कराझ, सबालेन्काची आगेकूच

**न्यूयॉर्क : वृत्तसंस्था**

पुरुष एकेरीतील दुसरा मानांकित तारांकित खेळाडू स्पेनचा कार्लोस अल्कराझ आणि महिला एकेरीत अरिना सबालेन्का यांनी अमेरिकन ग्रँडस्लॅम टेनिस स्पर्धेच्या पहिल्या फेरीत सहज विजय मिळवत आगेकूच केली.

अल्कराझने रोमन सफिउलिन याचा ६-४, ६-४, ६-४ असा पराभव केला. मनगटाच्या दुखापतीमुळे एप्रिल महिन्यापासून कोर्टपासून दूर राहिलेल्या अल्कराझने या स्पर्धेतूनच स्पर्धात्मक टेनिसमध्ये पुनरागमन केले, मात्र या सामन्यात त्या दुखापतीचा कोणताही त्रास दिसून आला नाही.

पुरुष एकेरीत जोकोविचनंतर आणखी एका मानांकित खेळाडूला पहिल्या फेरीत पराभवाचा सामना करावा लागला. स्टेफानोस





त्सित्सिपासने सिनसिनाटी स्पर्धेतील विजेता आणि दहावा मानांकित आर्थर फिल्स याला ४-६, ७-६ (७-३), ६-१, ६-४ असे पराभूत केले. त्सित्सिपास अमेरिकन स्पर्धेत प्रथमच बिगरमानांकित म्हणून खेळत आहे. अन्य लढतींमध्ये अमेरिकेच्या आठव्या मानांकित बेन शेल्टनने टॉलन ग्रिक्सपूरला १-६, ६-१, ७-६ (७-३), ६-२ असे नमविले. तर, कॅनडाच्या फेलिक्स ऑगर-ॲलिसिमेने रिंकी हिजीकातावर ७-५, ४-६, ६-३, ७-५ असा विजय मिळवला.

महिला एकेरीत सबालेन्काने देखिल आपली लढत सहज जिंकली. कोलंबियाच्या तकिने कॅमिला ओसोरिओचा ६-४, ६-४ असाच पराभव केला. सेरेना विल्यम्सनंतर सलग तिसऱ्यांदा ही स्पर्धा जिंकण्यासाठी सबालेन्का प्रयत्नशील आहे.

विम्बलडन विजेत्या नोस्कोवाने पहिल्या फेरीच्या लढतीत अमेरिकेच्या केटी व्होलिनेट्सचा ७-५, ६-१ असा पराभव केला. विशेष म्हणजे पहिल्या सेटला नोस्कोवा २-५ अशी मागे पडली होती. त्यानंतर सलग पाच गेम जिंकत तिने पहिला सेट जिंकला आणि नंतर दुसऱ्या सेटला व्होलिनेट्सला संधीच दिली नाही. त्याचवेळी उपविजेत्या कॅरोलिना मुचोव्हा हिने सिंज क्रॉस हिचा ६-३, ६-० असा पराभव केला.

आठव्या मानांकित इगा श्वीऑटेकने चीनच्या वांग झियुला ६-२, ६-३ असे सरळ सेटमध्ये नमविले. तर, जपानच्या नाओमी ओसाकाने अनास्तासिया झाकारोव्हाला ७-६ (८-६), ७-६ (७-३) असे पराभूत करीत पुढची फेरी गाठली.

वयाच्या ४१व्या वर्षी थेट प्रवेश मिळालेल्या स्टॅन वावरिंकाला निवृत्तीपूर्वीच्या अखेरच्या ग्रँडस्लॅम स्पर्धेत पहिल्या फेरीचा अडथळा पार करता आला नाही. इटलीच्या माटेओ बेरेट्टिनीने वावरिंकाचा ७-६ (७-४), ७-६ (७-३), ६-० असा पराभव केला.

# बीसीसीआयची आज मुंबईत बैठक

## संघाच्या परदेशातील कामगिरीचे होणार मूल्यमापन

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय संघाच्या विदेशी भूमीवरील खराब कामगिरीनंतर आता बीसीसीआयने भारतीय संघाचे मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर, निवड समितीचे अध्यक्ष अजित आगरकर आणि सेंटर ऑफ एक्सलन्सचे प्रमुख व्हीव्हीएस लक्ष्मण यांना गुरुवारी (दि.३) मुंबईतील बोर्डाच्या मुख्यालयात बैठकीसाठी बोलावले आहे. या बैठकीत भारतीय क्रिकेटच्या आगामी वाटचालीचा रोडमॅपदेखील ठरवला जाणार आहे.

या बैठकीत आयर्लंड आणि इंग्लंड दौऱ्यांवरील भारतीय संघाच्या पराभवाचाही आढावा घेतला जाणार आहे.





भारतीय संघाच्या अलीकडच्या विदेश दौऱ्यांचा निकाल पाहता परिस्थिती फारशी समाधानकारक नाही. जूनमध्ये आयर्लंडविरुद्धची दोन सामन्यांची टी-२० मालिका भारताने २-०ने गमावली. त्यामुळे टी-२० विश्वचषक विजेत्या भारतीय संघाची जवळपास तीन वर्षांपासून सुरू असलेली सलग १६ मालिका विजयांचा सिलसिला थांबला. त्यानंतर इंग्लंड दौऱ्यावरही भारताची कामगिरी निराशाजनक राहिली. भारताने पाच सामन्यांची टी-२० मालिका ४-०ने गमावली. नॉटिंगहॅममध्ये झालेला १२५ धावांचा पराभव हा या दौऱ्यातील सर्वात मोठ्या धक्क्यांपैकी एक ठरला.

वनडे मालिकेत यानंतर भारताने काही प्रमाणात पुनरागमन केले. बर्मिंगहॅममधील पहिला वनडे सामना जिंकत भारताने मालिकेची चांगली सुरुवात केली, मात्र अखेर ही मालिका भारताला २-१ने गमवावी लागली. त्यामुळे आता बीसीसीआयच्या बैठकीत संघाची विदेशातील कामगिरी, निवड प्रक्रिया आणि आगामी काळातील नियोजनावर काय चर्चा होते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# नव्या कोचच्या नियुक्तीसाठी घाई नाही : ऋतुराज गायकवाड

**मुंबई : प्रतिनिधी**



चेन्नई सुपर किंग्सचा कर्णधार ऋतुराज गायकवाडने संकेत दिले आहेत की, स्टीफन फ्लेमिंग यांच्या जागी नव्या मुख्य प्रशिक्षकाची नियुक्ती करण्याची फ्रँचायझीला घाई नाही. फ्लेमिंग यांच्या उत्तराधिकाऱ्याबाबत फ्रँचायझीने चर्चा सुरू केली आहे, मात्र पुढील आयपीएल हंगामाला अजून बराच वेळ असल्याने सध्या निर्णय घेण्याची घाई संघ करत नाही, असे ऋतुराजने सांगितले.

दरम्यान, सीएसकेच्या कर्णधारपदाची अतिरिक्त जबाबदारी सांभाळताना आपण अजिबात अस्वस्थ नसल्याचेही ऋतुराजने स्पष्ट केले. एमएस धोनीकडून कर्णधारपदाची जबाबदारी स्वीकारणे ही मोठी गोष्ट आहे. त्याने मिळवलेल्या अफाट यशामुळे ही जबाबदारी आणखी मोठी होते आणि साहजिकच आणखी विजय आणि जेतेपदांच्या अपेक्षाही असतात, पण हा या भूमिकेचा एक भाग आहे. जोपर्यंत मला हे आव्हान आवडत आहे, तोपर्यंत मी ही भूमिका आनंदाने पार पाडेन." असे ऋतुराज म्हणाला.

# जेफ्री बॉयकॉट यांच्याकडून जडेजाचे कौतुक

**लंडन : वृत्तसंस्था**

इंग्लंडचे माजी फलंदाज जेफ्री बॉयकॉट यांनी भारताचा अष्टपैलू रवींद्र जडेजा याचे कौतुक केले आहे. ३७ वर्षीय जडेजाने श्रीलंकेविरुद्ध झालेल्या मालिकेत आठ विकेट्स पटकावल्या होत्या. स्टिक टू क्रिकेट पॉडकास्टमध्ये डेव्हिड लॉइड, मायकेल वॉन, फिल टफनेल आणि ॲलिस्टर कुक यांनी बॉयकॉट यांच्याशी संवाद साधला.

नव्या पिढीतला तुमचा आवडता खेळाडू कोण? असे बॉयकॉट यांना विचारण्यात आले. मायकेल वॉन यांनी त्यांना 'फॅब फोर' अर्थात विराट कोहली, जो रुट, केन विल्यमसन आणि स्टीव्हन स्मिथ यांची आठवण करून दिली. ते यांच्यापैकी कुणाचे तरी किंवा एखाद्या फलंदाजाचे नाव घेतील असे वाटले होते, मात्र बॉयकॉट यांनी जडेजाचे नाव घेतले.

बॉयकॉट म्हणाले, रवींद्र जडेजा सुरेख गोलंदाजी करतो. त्याचे क्षेत्ररक्षण चित्त्यागत आहे. तो फलंदाजीही करतो. बॅटपॅड एकत्र ठेवून, डोके संतुलित स्थितीत अशा



पद्धतीने संयमी फलंदाजी करतो. तो देखणाही आहे. मी अलीकडेच त्याला भेटलो. त्याला भेटण्याची माझी पहिलीच वेळ होती. भारत दौऱ्यादरम्यान माझी जडेजाशी भेट झाली. मी त्याला भेटलो आणि सांगितले की, तू माझा आवडता खेळाडू आहेस. तो त्वरित म्हणाला, काहीही काय. मी त्याला म्हणालो, 'खरंच आहेस'.

श्रीलंकेविरुद्धच्या मालिकेत जडेजाने आणखी एक विक्रम नावावर केला. कसोटी प्रकारात चार हजार धावा आणि ३५० विकेट्स अशी दुहेरी कामगिरी करणारा जडेजा केवळ चौथा क्रिकेटपटू ठरला आहे. इयान बॉथम, डॅनियल व्हेटोरी, कपिल देव यांच्या मांदियाळीत जडेजाचा समावेश झाला.

# दिलदार मनाचा सूर्यकुमार यादव!



**मुंबई : प्रतिनिधी**

टी-२० वर्ल्डकप विजेता माजी कर्णधार सूर्यकुमार यादव सध्या भारतीय संघात पुनरागमन करण्यासाठी जोरदार प्रयत्नशील आहे. यादरम्यान त्याचा एक व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे.

सूर्यकुमार यादव भारतीय संघाचा भाग नसला, तरीदेखील त्याची लोकप्रियता काही कमी झालेली नाही. अजूनही सूर्याची एक झलक पाहण्यासाठी चाहते तुफान गर्दी करतात. एका व्हिडीओमध्ये सूर्या कारमधून उतरताना दिसून येत आहे. यादरम्यान चाहते ऑटोग्राफ घेण्यासाठी आणि सूर्यासोबत फोटो क्लिक करण्यासाठी धावत येतात. एका चाहत्याला त्याच्याकडून ऑटोग्राफ हवा असतो, पण त्याच्याकडे पेनही नसतो आणि पेपरही नसतो. त्यावेळी सूर्या स्वतः आपल्या कारमधून पेन आणि पेपर घेतो आणि त्या चाहत्याला ऑटोग्राफ देतो. सूर्याच्या या मोठेपणाचा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.

काही दिवसांपूर्वी सूर्यकुमार यादवने मुंबईतील प्रो गोविंदा या कार्यक्रमाला हजेरी लावली होती. सूर्यकुमारची प्रो गोविंदाचा ब्रँड अँबेसेडर म्हणून नेमणूक करण्यात आली आजे. या स्पर्धेतील फायनलच्या दिवशी सूर्याने हजेरी लावत गोविंदांसोबत घेऊन टाक या गाण्यावर भन्नाट डान्स करताना दिसून आला होता.

# कुणाल पांड्या म्हणतो, होप इज स्टील अलाईव्ह!



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

अफगाणिस्तानविरुद्ध टी-२० मालिकेसाठी बीसीसीआयकडून भारतीय संघाची घोषणा करण्यात आली आहे. या संघात काही नवख्या खेळाडूंना संधी देण्यात आली आहे, पण अनुभवी अष्टपैलू खेळाडू क्रुणाल पांड्याला वगळण्यात आले आहे. दरम्यान, संघाची घोषणा झाल्यानंतर क्रुणालने आपल्या इंस्टाग्राम अकाऊंटवर स्टोरी शेअर केली आहे.

आयपीएलमध्ये रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाला दोन वेळा चॅम्पियन बनवण्यात क्रुणाल पांड्याने मोलाची भूमिका बजावली आहे. आयपीएल २०२६मध्ये त्याने गोलंदाजीसह फलंदाजीतही दमदार कामगिरी केली होती. त्यामुळे त्याला विश्वास होता की, आगामी टी-२० मालिकेसाठी त्याला भारतीय संघात स्थान मिळू शकते, पण निवडकर्त्यांनी त्याच्याकडे दुर्लक्ष केले आहे.

भारतीय संघाची घोषणा झाल्यानंतर क्रुणाल पांड्याने आपल्या इंस्टाग्राम अकाऊंटवर स्टोरी शेअर केली आणि चार शब्दांत आपल्या भावना व्यक्त केल्या. त्याने आपल्या स्टोरीमध्ये, "होप इज स्टील अलाईव्ह", असे लिहिले आहे. ही स्टोरी शेअर करून त्याने दाखवून दिले की, आता जरी संघात स्थान मिळाले नसले तरीदेखील त्याने पुनरागमन करण्याची आशा सोडलेली नाही.






दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. —मुख्य संपादक


हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com